गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणूक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्ट्स् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०५.०७.२०२५ | अंक नं. ८३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाळाजी डेडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
चलो दुबई या योजनेतील गिफ्ट बॉक्सेसचे भाग्यवान विजेते.



CKJ आजचा भाव — 05 जुलै — 22 कॅरेट सोन्याचा भाव (प्रती ग्रॅम) ₹8888/-*
CKJ उद्याचा भाव — 06 जुलै — 22 कॅरेट सोन्याचा भाव (प्रती ग्रॅम) ₹8888/-*

आषाढी एकादशी उपवासासाठी स्पेशल — रविवार ६ जूलै
टक्कर मलाई लस्सी
कैलास उडपी लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES — Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

खास आषाढी एकादशीनिमित्त उपवासासाठी...
• बासुंदी • रसमलाई • श्रीखंड
• उपवासाचे पॅटीस
• साबुदाणा वडा
• बटाटा चिवडा व वेफर्स
बम्बईवाला — Since 1910 — मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रूट । दिल्ली चाट । फास्टफूड
कापड बाजार, अ.नगर. । चाणक्य चौक, बुरुडगाव रोड, अ.नगर.
मो. : 9822041013 / 9623882710

# जिल्ह्यात अवैध धंद्यांवर छापेमारी मात्र चोऱ्या-घरफोड्या वाढल्या त्याचे काय?

## भरदिवसाही फोडली जाताहेत घरे, महामार्गावरील लुटमारीही सुरुच

नगर – जिल्ह्यात सध्या पोलिस यंत्रणेकडून मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यांवर छापेमारी सुरु आहे. पोलिसांची गस्त वाढविण्यात आलेली आहे. रात्री संशयितरित्या फिरणाऱ्यांवरही कारवाया केल्या जात आहेत. मात्र तरीही नगर शहरासह जिल्ह्यात चोऱ्या-घरफोड्या, रात्रीच्या वेळी महामार्गावर वाहनचालकांना अडवून लुटमार करण्याच्या घटना सुरूच आहेत. त्यात वाढच झालेली दिसून येत आहे. रात्रीच नव्हे तर भरदिवसाही घरे फोडली जात आहेत. या चोऱ्या रोखण्यासाठी पोलिस यंत्रणेकडून ठोस उपाययोजना कधी केल्या जाणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करू लागले आहेत.

नगर जिल्ह्यात नव्याने बदलून आलेल्या पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी पदभार घेताच जिल्ह्यातील सर्व प्रकारचे अवैध धंदे बंद करण्याचे आदेश पोलिस यंत्रणेला दिले. विशेष पथक नेमून त्या पथकाद्वारे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने जिल्ह्यात छापेमारी सध्या जोरात सुरु आहे. अनेक मोठमोठ्या कारवाया केल्या जात आहेत. त्यामुळे अवैध धंदे करणारांचे धाबे दणाणले आहेत. नगर शहरातील पान टपऱ्यांवर मावा, गुटखा, पानमसाला मिळणे बंद झाले आहे. अनेक टपऱ्या तर बंदच झाल्या आहेत. जुगार अड्डे, वाळू तस्करी करणारांवरही मोठ्या प्रमाणात कारवाया सुरु आहेत. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. हे गरजेचेच होते. पण दुसरी कडे चोऱ्या-घरफोड्या, लुटमारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झालेली आहे.

चोरटे दिवसाढवळ्या घरे फोडून एक प्रकारे पोलिसांनाच आव्हान देत आहेत. त्याकडेही पोलिस यंत्रणेने लक्ष देण्याची गरज निर्माण झालेली आहे. कारण सर्वसामान्य नागरिकांनी गेले अनेक दिवस मेहनत घेवून पै-पै जमवून खरेदी केलेले दागिने, साठवलेला पैसा चोरटे काही क्षणात लंपास करत आहेत. त्यामुळे काहींच्या मुला मुलींचे शिक्षण, लग्न, काहींचे आजारपणावरील उपचार थांबले जात आहेत. त्यामुळे पोलिस यंत्रणेने अवैध धंद्यांच्या सोबतच वाढत्या चोऱ्यांच्या घटना रोखण्यासाठीही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. गेल्या २ दिवसांत घडलेल्या अशा प्रकारच्या घटना पुढील प्रमाणे...

### सारसनगरमध्ये घर फोडून १० तोळ्याच्या दागिन्यांसह रोकडची चोरी

सारसनगर परिसरात एका बंद घराचे कुलूप तोडून तीन अज्ञात चोरट्यांनी सुमारे १० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व ८ हजार रुपयांची रोकड असा ऐवज लंपास केल्याची घटना ३ जुलै रोजी सायंकाळी ५.१५ ते ७.१५ या कालावधीत घडली. केवलकुमार भगवानदास गांधी (वय ५७, रा. सारसनगर, अ.नगर) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे घराला कुलूप लावून कुटुंबासह बाहेर गेले असताना त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात तिघांनी घरात प्रवेश केला. घरातील सामानाची उचका पाचक करुन बेडरुम मधील कपाटाचे लॉक तोडून लॉकर मधील ५ तोळे वजनाचे काळे मणी असलेले सोन्याचे पट्टीचे मंगळसूत्र, ४ तोळे वजनाचे २ कोल्हापुरी पद्धतीचे कंगण, ११ ग्रॅम वजनाचे इतर दागिने (आंगठ्या), ८ हजार रुपयांची रोकड असा ऐवज चोरुन नेला. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात केवलकुमार गांधी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (अ) सह ३३१ (३) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल केला.

### बोल्हेगाव येथे घरातून दागिने, रोकड इलेक्ट्रॉनिक साहित्याची चोरी

बोल्हेगाव परिसरातील नवनाथ नगर, कातोरे वस्ती येथे घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून दागिन्यांसह रोख रक्कम आणि इलेक्ट्रॉनिक साहित्य असा मुद्देमाल चोरून नेला आहे. या प्रकरणी घरमालक प्रवीण अच्युत कराळे (वय २९) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात ३ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २७ जून रोजी रात्री १० ते २८ जूनच्या पहाटे ३ वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान, घरमालक प्रवीण कराळे आणि त्यांचे कुटूंब हे मूळगावी कामत शिंगवे (ता. पाथर्डी) येथे गेले होते. ही संधी साधून चोरट्याने बंद घराचे कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला आणि घरातील मुद्देमाल चोरून नेला. घरातील बॅगेत ठेवलेले ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुबे, बेडरूममधील ८ हजार ५०० रूपयांची रोख रक्कम, टीव्ही आणि होम थिएटर असा मुद्देमाल चोरीस गेला आहे.

### राघवेंद्र स्वामी मंदिरातील दानपेटी फोडून चोरी

बोल्हेगाव येथील राघवेंद्र स्वामी मंदिराच्या बाहेरील दानपेटी फोडून अज्ञात चोरट्यांनी अंदाजे ६ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना २ जुलै रोजी रात्री ८ वाजेपासून ते ३ जुलै सकाळी ७ वाजेच्या दरम्यान घडली.

याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात सचिन धोंडीभाऊ सिनारे (वय ३२, रा. राघवेंद्र स्वामी मंदिर, बोल्हेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे श्री नवनाथ देवस्थान सेवा मंडळ ट्रस्टमध्ये क्लार्क म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या ट्रस्टचे राघवेंद्र स्वामी मंदिर हे नेहमी प्रमाणे रात्री ९ वाजता मंदिर बंद केल्यानंतर सकाळी ७ वाजता उघडले जाते. नेहमीप्रमाणे ३ जुलै रोजी सकाळी सुरक्षा रक्षक निकीता माणिक गवते यांनी मंदिर उघडले असता मंदिराच्या बाहेरील दानपेटी फोडलेली त्यांच्या निदर्शनास आले त्यांनी ही माहिती सिनारे यांना दिली. त्यांनी तातडीने मंदिरात धाव घेतली. त्यांना दानपेटीचा कडीकोयंडा तोडलेला दिसून आला. पेटी संपूर्ण मोकळी असून दानपेटीत असलेली सुमारे सहा हजार रुपये रक्कम दिसून आली नाही. या प्रकरणी सचिन सिनारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला.

दरम्यान गुन्हा दाखल होताच तोफखाना पोलिसांनी घटनेच्या अनुषंगाने तपास केला असता हा गुन्हा शारुन डाके (रा.गांधीनगर बोल्हेगाव) व त्याचे दोन अल्पवयीन साथीदारांनी केला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी शारुन डाके याचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. त्यानंतर त्याच्या दोन साथीदारांचा शोध घेतला असता ते दोघे मिळून आल्याने त्यांना पोलिसांनी पालकासमक्ष ताब्यात घेतले. त्यांनी चोरी केल्याची कबुली दिली. ही चोरी मौज-मजा करण्यासाठी पैसे मिळावे म्हणून केली असल्याची माहिती दिली. ही कारवाई तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी, सहाय्यक फौजदार गोपीनाथ गोरडे, पोलिस अंमलदार योगेश चव्हाण, अब्दुल इनामदार, सुधीर खाडे, सुमित गवळी, बाळासाहेब भापसे, सुजय हिवाळे, सतीश भवर, भागवत बांगर, अविनाश बर्डे, रोहकले यांनी केली आहे.

बाळांच्या वजन, उंची, भूक व प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी आजच भेट द्या.
सन-२०१० पासून
चिरायु लहान मुलांचे क्लिनिक
(जन्मापासून ते १८ वर्षापर्यंत)
शाखा १ - सबजेल चौक, तुळजाभवानी मंदिरासमोर (डायमंड बेकरी समोर) अहिल्यानगर
9527931384 / 8830400170

BRANDED
जीन्स व फॉरमल पॅन्ट
₹500 ला एक
₹900 ला दोन
₹1200 ला तीन
*मर्यादित स्टॉक
भरपूर व्हरायटीज्
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही मयुरी लेडिज मॉलच्या वर
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. ९०२८२०११८८
Terms & Conditions Apply.

ABHAY SALES CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
बाथरूमची शोभा वाढविणारे वन पीस कमोड
तेही नवीन व्हरायटी उपलब्ध..
• ग्रॅव्हिटी
• जग्वार
• जॉन्सन

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# प्रेरणादायी अक्षरधन...






## तीर्थ विठ्ठल...क्षेत्र विठ्ठल...देह विठ्ठल... बोलावा विठ्ठल... पाहावा विठ्ठल...

युगे २८ पासून विठुराजा सच्च्या भक्तासाठी उभा आहे. कलियुगातला तुमच्या भाबड्या वारकऱ्यांनाही त्याची त्याच्या थेट दर्शनाची अनावर ओढ असते. आषाढी एकादशीला तर या भक्तीची त्सुनामीच आलेली असते.

यंदा रविवारी पंढरपूरच्या वाळवंटी काठी वैष्णव खेळ मांडतील. हजारो दिंड्यांतून लाखो वारकरी नामघोषाच्या निनादात, टाळमृदंगाच्या जयघोषात असमंत दणाणून सोडतील.

या विठ्ठलाची, पंढरीची था कल्पना अन् ऐकलेल्या गोष्टीही असंख्या आहेत. एका अभंगानुसार 'आधी रचिली पंढरी, मग वैकुंठ नगरी' किंवा जेव्हा नव्हते चराचर तेव्हा होते पंढरपूर इ. येथे असणारी विठ्ठलाची मूर्ती जगप्रसिद्ध हमपी येथून आलेली आहे.

काहींची अशीही परंपरा आहे की एकादशीचा उपवास पंढरीला तर बारस अर्थात बार्शीला तो सोडवायचा (पारणा) या मागणी कथा अशी की राजा अंबरीशच्या शापाने भगवान विष्णूंनी दशावतार घेतले त्याची रुजवात या बार्शीत झाली. त्या दशावतारापूर्वीची भगवंतांची मोहक मूर्ती या आर्शीत असून १६ खांबी मंदिरात त्यांच्या सोबत माता लक्ष्मी सुद्धा आहे. याचेही दर्शनानुभव घ्यायला पाहिजे.

बाकी पंढरीची आषाएी एकादशी म्हणजे जगातले चालते बोलते आठवे आश्चर्यच. किंबहुना एकमेव भव्य दिव्य आश्चर्य म्हणता येईल. योगायोगाने याच दिवसात पुरीला (भुवनेश्वर) भगवान जगन्नाथाची भव्य रथयात्रा संपन्न होते. आपल्या पांडुरंगाला पायावर डोके टेकवीत डोळे भरुन पाहात, किमान कळस दर्शन व प्रदक्षिणा घालून लाखो वारकरी जीवन सार्थक झाल्याचे मानतात. जातपात, उच्चनीच या शुद्र विचारांना तिलांजली देणाऱ्या या विठुरायाला उपमा तरी काय अन् किती द्याव्या. सर्व वारकरी व भाविक भक्तांना जय जय रामकृष्ण हरी....

# हिंदुत्ववादी संघटनांकडून होणारा डॉ.बाबासाहेबांचा अपमान थांबवावा

नगर - हिंदुत्ववादी संघटनांच्या स्टेजवरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो आणि जय भीमचे निळे झेंडे वापरण्यावर बंदी घालावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. ५ जुलै रोजी शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत ही भूमिका स्पष्ट करण्यात आली. तर शहरात बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरण कार्यक्रमाच्या नियोजनासाठी घेण्यात आलेल्या बैठकीवर बहिष्कार टाकण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. या बैठकीस जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या अध्यक्षतेखाली शहराध्यक्ष हनीफ शेख, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, जिल्हा सल्लागार जे. डी. क्षीरसाठ, युवक शहराध्यक्ष अॅड. योगेश गुंजाळ आदी उपस्थित होते.


वंचित बहुजन आघाडीच्या बैठकीत बोलताना जिल्हाध्यक्ष योगेश साठे

वंचित बहुजन आघाडीच्या म्हणण्यानुसार, हिंदुत्ववादी संघटना जिल्ह्यात ठिकठिकाणी आपल्या बॅनरवर बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो वापरत असून, त्यांच्या नावे संविधानातील समता, स्वातंत्र्यता, बंधुता व न्याय या मुल्यांची पायमल्ली करीत आहेत. हे संपूर्णपणे बाबासाहेबांच्या विचारांविरोधात असून, त्यांनी लिहिलेल्या धर्मनिरपेक्ष घटनेला छेद देणारे आहे. फुले-शाहू-आंबेडकरी विचारांच्या नागरिकांना एकत्र येऊन या प्रकारांना विरोध करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

योगेश साठे म्हणाले की, हिंदू राष्ट्राची संकल्पना रेटणाऱ्या संघटनांनी बाबासाहेबांचा वापर थांबवावा. त्यांच्या विचारांचा वापर केवळ राजकीय लाभासाठी करणाऱ्यांविरोधात जनजागृती करण्याची गरज आहे. स्वतःला आंबेडकरवादी म्हणवणाऱ्या नेत्यांना अमिष दाखवून समाजात फूट पाडण्याचा डाव रचला जात आहे. या प्रवृत्ती समाजात जातीय तेढ आणि द्वेष पसरवत असून, भविष्यात यामुळे जातीय संघर्ष उद्भवण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे ते म्हणाले.

नगर शहरात उभारण्यात आलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा अजूनही उघड न करता झाकून ठेवण्यात आलेला आहे. यामुळे आंबेडकरी समाजात तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. हिंदूत्ववादी विचारांचा अजेंडा घेऊन जाणाऱ्या आमदार संग्राम जगताप यांनी बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणासाठी घेतलेल्या बैठकीवर वंचित बहुजन आघाडी बहिष्कार टाकत असल्याची भूमिका मांडण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय नेते अॅड. प्रकाश आंबेडकर यांचे आदेश मिळताच समाजाच्या वतीने पुतळा बाबासाहेबांचा पूर्णाकृती पुतळा खुला करण्याचा इशारा या बैठकीतून देण्यात आला.

# आ.संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी देणारा जेरबंद, तेलंगणामधून घेतले ताब्यात

नगर - आ. संग्राम जगताप यांना जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक तपासाव्दारे एका संशयित आरोपीला तेलंगणा राज्यातून अटक केली आहे. अनिस महंमद हनिफ शेख (वय ३२, मुळ रा. रूस्लाबाद, चकलंबा, ता. गेवराई, जि. बीड, हल्ली रा. नारेगाव, ता. जि. छत्रपती संभाजीनगर) असे त्याचे नाव आहे.

२ जुलै रोजी एका अल्पवयीन मुलीला इंस्टाग्राम अकाउंटवरून धमकीसंदर्भात दोन अश्लिल मेसेज आल्याने कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच दिवशी आ. जगताप यांचे खासगी स्वीय सहाय्यक सुहास साहेबराव शिरसाठ (रा. बुरुडगाव रस्ता, अहिल्यानगर) यांच्या मोबाईलवर अनोळखी क्रमांकावरून 'संग्राम को दो दिन के अंदर खत्म करूंगा' असा धमकीचा मेसेज आल्यानंतर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता.

या दोन्ही गंभीर प्रकरणांची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना तपासासाठी पथक तयार करण्याचे आदेश दिले. उपनिरीक्षक अनत सालगुडे, अंमलदार फुरकान शेख, रवींद्र चुंगासे, सागर ससाणे आणि अमृत आढाव यांच्या सहभागातून हे पथक कार्यरत करण्यात आले. तांत्रिक विश्लेषणाव्दारे हा गुन्हा अनिस महंमद हनिफ शेख याने केल्याचे निष्पन्न झाले. सदर संशयित आरोपी सध्या निजामाबाद, तेलंगणा राज्यात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धग्गी (ता. जि. निजामाबाद) येथे छापा टाकून त्याला अटक केली. संशयित आरोपी अनिस शेख याने प्राथमिक चौकशीदरम्यान आपला गुन्हा मान्य केला आहे.

# घरफोड्या करणारी आंतरजिल्हा टोळी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद, आरोपीकडून २५० ग्रॅम सोन्यासह २४ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर - घरफोड्या करणारी आंतरजिल्हा टोळी स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केली असून पकडलेल्या आरोपींकडून २५० ग्रॅम सोन्यासह २४ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या टोळीने अहिल्यानगर, सातारा, नाशिक व पुणे जिल्ह्यात १६ घरफोड्या केल्याचे तपासात समोर आले आहे. पकडलेल्यांमध्ये मिलींद उर्फ मिलन ईश्वर भोसले (वय २८, रा.बेलगाव, ता.कर्जत), सुनिता उर्फ सुंठी देविदास काळे (वय ३५, रा.नारायण आष्टा, ता.आष्टी, जि.बीड) व एक १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा (रा.बेलगाव, ता.कर्जत) यांचा समावेश आहे.

संगमनेर तालुक्यातील बोटा येथील श्रीमती शालिनी बाळशीराम शेळके यांचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी २० जून रोजी सोन्याचे दागीने चोरून नेले होते. याबाबत घारगाव पोलीस स्टेशन मध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांनी पोलिस उपनिरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, फुरकान शेख, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, सुनील मालणकर, भगवान थोरात, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, भगवान धुळे व भाग्यश्री भिटे अशांचे पथक नेमुण गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला होता.


घरफोड्या करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद करून जप्त केलेल्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या पथकास गुन्ह्याचे तपासात तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे घारगाव पोलीस स्टेशनला दाखल असलेला गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपी मिलींद उर्फ मिलन ईश्वर भोसले याने त्याचे साथीदारासह केल्याची माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने कर्जत तालुक्यात आरोपींचा शोध घेऊन मिलींद उर्फ मिलन ईश्वर भोसले, सुनिता उर्फ सुंठी देविदास काळे व एका अल्पवयीन मुलास पकडले. त्यांच्याकडे कसून चौकशी केल्यावर सदरचा गुन्हा त्यांचे साथीदार शुभम उर्फ बंटी पप्पु काळे (रा.एम.आय.डी.सी. अहिल्यानगर) (फरार), सोन्या उर्फ लाल्या ईश्वर भोसले (रा. बेलगांव, ता. कर्जत) (फरार), संदीप ईश्वर भोसले (फरार), कुन्हा ईश्वर भोसले (फरार) अशांनी मिळून केल्याची माहिती सांगितली.

तसेच या सर्वांनी अहिल्यानगर जिल्हयातील घारगाव, श्रीरामपूर, संगमनेर त्याचप्रमाणे पुणे, सातारा, नाशिक जिल्ह्यामध्ये घरफोडीचे गुन्हे केल्याच्या सांगीतलेल्या माहितीवरून १६ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

ताब्यातील आरोपी मिलींद ईश्वर भोसले याचेकडे गुन्हयातील चोरी केलेल्या मुद्देमालाबाबत विचारपूस केली असता त्याने काही मुद्देमाल हा त्याची बहीण सुनिता उर्फ सुंठी देविदास काळे, रा.नारायण आष्टा, ता.आष्टी, जि.बीड व त्याची पत्नी कोमल मिलींद भोसले यांचे मार्फतीने सोनारास विकला असल्याचे व काही मुद्देमाल त्याने त्याचे नातेवाईकाचे घरामागे लपवून ठेवला असल्याची माहिती सांगीतली. पथकाने पंचासमक्ष सोनाराने हजर केलेले ४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व आरोपीने काढुन दिलेला १९ लाख ७६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल त्यात २०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे विविध वर्णनाचे दागीने, गुन्हयाचे वेळी वापरलेला गावठी कट्टा, ३ जिवंत काडतुस, मोटार सायकल व लोखंडी कटावणी असा एकुण २४ लाख २६ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## अमेय गोल्ड (कडावाला) चे संचालक
## संजय भंडारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील अरिहंत कॉलनी पूनम मोतीनगर येथील रहिवासी संजय फुलचंद भंडारी (कडावाला) (वय ५८) यांचे ४ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे. श्रेया, साहील भंडारी यांचे ते वडील होत. गंज बाजारातील अमेय गोल्डचे ते संचालक होते.

## हिरालाल गुगळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी शिराळ येथील रहिवासी हिरालाल उत्तमचंद गुगळे (वय ६४) ४ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी शिराळ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## वसंतराव सुतार यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - सावतानगर पंपिंग स्टेशन भिंगार येथील रहिवासी वसंतराव सवित्रा सुतार (वय ६९) यांचे ३ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, ३ पुतणे, सुना, नातवंडे, १ चुलत बहिण असा परिवार आहे.

## सारिका येनगूल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - श्रमीकनगर येथील रहिवासी सारिका विठ्ठल येनगूल (वय ३८) यांचे ३ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, ४ बहिणी असा परिवार आहे. विठ्ठल येनगूल यांच्या त्या कन्या होत.

## पुष्पलता दुधाले यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर - बुऱ्हाणनगर येथील पुष्पलता वसंतराव दुधाले (वय ९१) यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात १ मुलगा, सुना, २ भाऊ शामराव व दशरथ कलमदाणे, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर बुऱ्हाणनगर येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# स्वस्तात प्लॉट देण्याच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्या पोलिसाला अटक

## न्यायालयाने सुनावली ३ दिवसांची पोलिस कोठडी, पोलिस खात्यातून केले निलंबित

नगर - नालेगाव येथील 'लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था'च्या नावाखाली स्वस्त दरात प्लॉट मिळवून देण्याचे आमिष दाखवून शंभरहून अधिक नागरिकांची फसवणूक करणाऱ्या प्रकरणात अखेर पोलिसांनी स्वतःच्या खात्यातील अंमलदार अशोक बाळु पुंड (रा. साई गजानन कॉलनी, लेखानगर, सावेडी) याला अटक केली असून, न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलीस कोठडी (७ जुलैपर्यंत) सुनावली आहे.

दरम्यान, या प्रकरणातील दुसरा संशयित प्रकाश भुमय्या कोटा (रा. बालाजी सोसायटी, कल्याण रस्ता, अहिल्यानगर) याला यापूर्वीच अटक करण्यात आली होती. या प्रकरणाची फिर्याद १२ जून रोजी कैलास नामपेल्ली उषाकोयल (वय ६१, रा. झारेकर गली, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल केली होती. उषाकोयल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, अशोक पुंड व प्रकाश कोटा यांच्याशी पूर्वीपासून ओळख होती. त्यांनी २०११ साली 'लोकमंगल' गृहनिर्माण संस्था स्थापन करून गरीबांना ५०० चौरस फूटाचे प्लॉट अत्यंत स्वस्त दरात मिळवून देण्याचे आमिष दिले.

शासन दरबारी संपूर्ण प्रक्रिया पार पाडून प्लॉट मिळतील, असा विश्वास दिला. यावर विश्वास ठेवून फिर्यादी त्यांच्या व नातेवाइकांकडून रोख स्वरूपात सुमारे ७.२५ लाख रूपयांची रक्कम जमा करण्यात आली. मात्र, दीर्घकाळ लोटूनही प्लॉटचा ताबा मिळाला नाही, त्यामुळे अखेर त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली होती. चौकशीनंतर गुन्हा दाखल झाला. या प्रकरणात शंभराहून अधिक नागरिकांचे पैसे गुंतले गेले असून त्यांनाही आजतागायत प्लॉट मिळालेला नाही. दरम्यान, या प्रकरणात मुख्य संशयित आरोपी असलेल्या पोलीस अंमलदार अशोक पुंड याला अटक होईल का, याकडे अनेकांचे लक्ष लागून होते. मात्र पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या प्रकरणात कोणतीही गय न करता कारवाईचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे व पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेंदवड यांच्या पथकाने पुंड याला केडगाव परिसरातून अटक केली.

### पोलीस अधिक्षकांनी काढले निलंबनाचे आदेश

अशोक पुंड हा जिल्हा पोलीस दलातील अंमलदार असून, त्याची नेमणूक आर्थिक गुन्हे शाखेत होती. मात्र, गुन्ह्याची कुणकुण लागताच ते सुट्टीवर जाऊन गायब झाला होता. अखेर पोलिसांनी त्यांना अटक केल्यानंतर पोलीस अधीक्षक घार्गे यांनी त्याला खात्यातून तत्काळ निलंबीत केले.


जुगार अड्ड्यावर छापा टाकून ९ जणांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

# केडगाव लिंकरोडवरील जुगार अड्ड्यावर छापा, ६ लाखांच्या मुद्देमाला सह ९ जणांना घेतले ताब्यात

नगर - केडगाव येथील लिंक रोड वरील शेटे मळा परिसरात डांबरी रस्त्यावर, कडुनिंबाच्या झाडाखाली सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकून ९ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडून ६ लाख ७ हजार ४९० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. ही कारवाई ४ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता करण्यात आली.

कोतवाली पोलिसांना मिळालेल्या माहिती वरुन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व त्यांच्या पथकाने केडगाव येथील लिंक रोडवरील शेटे मळा येथील डांबरी रस्त्यालगत झाडाखाली सुरु असलेल्या जुगार अड्डयावर छापा टाकला. ९ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून तिरट जुगाराचे साहित्य, ८ मोबाईल फोन, एक चारचाकी अल्टो कार, ६ मोटारसायकली, आणि रोख रक्कम असा एकूण ६ लाख ७ हजार ४९० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार महेश पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नऊ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक कृष्णकुमार सेदवाड हे करीत आहेत. ही कारवाई गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोलीस अंमलदार बाळकृष्ण दौंड, विशाल दळवी, सलीम शेख, विनोद बोरगे, विक्रम वाघमारे, सत्यजीत शिंदे, अमोल गाडे, अतुल काजळे, महेश पवार, शिरीष तरटे, सचिन लोळगे, दत्तात्रय कोतकर, प्रतिभा नागरे व दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडु यांनी केली आहे.

# मोहरम मिरवणुकांमुळे शहरात 'नो व्हेईकल झोन' जाहीर

नगर - नगर शहरात मुस्लिम धर्मियांचा मोहरम उत्सव सध्या सुरु असून, ५ जुलै रोजी कत्तलची रात्र आणि ६ जुलै रोजी मोहरम विसर्जन मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये म्हणून दोन दिवसांसाठी काही मार्गांवर वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे, असे आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले.

५ जुलै रोजी कत्तल रात्र मिरवणूक मार्ग - कोठला मैदान, फलटण चौकी, बारा इमाम हवेली, मंगलगेट, दाळमंडई, तेलीखुंट, कापड बाजार, शहाजी चौक, मोची गल्ली, नवा मराठा प्रेस, जुना कापड बाजार, भिंगार वाला चौक, अर्बन बँक रोड, लक्ष्मीबाई कारंजा, कोर्ट मागील भाग, सबजेल चौक, मनपा चौक, पंचपिर चावडी, धरती चौक - हातमपुरा, डावरे गल्ली, नालबंद खुंट, रामचंद्र खुंट किंग्स गेट, कोंड्या मामा चौक फलटन चौकी असा राहील.

तर ६ जुलै रोजी विसर्जन मिरवणूक मार्ग -कोठला, फलटन चौकी बारा इमाम हवेली, मंगलगेट आडते बाजार, पिंजार गल्ली, पारशा खुंट, जुना कापड बाजार, देवेंद्र हॉटेल ख्रिस्त गल्ली, बुरुड गल्ली, जुना बाजार, पंचपीर चावडी, मनपा, दो बोटी चिरा मस्जिद, कोर्ट मागील बाजू, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट, नीलक्रांती चौक, बालीकाश्रम रोड, बाराइमाम बारव सावेडी गाव असा मार्ग राहील.

या आदेशातून शासकीय वाहने, अँम्ब्युलन्स, फायर ब्रिगेड, मिरवणुकीसाठी अधिकृत परवानगी मिळालेली वाहने व प्रशासनाकडून विशेष परवानगी असलेली वाहने वगळण्यात आली आहेत.

## नगरमधून ४३९ जण हद्दपार

मोहरम सुरळीत पार पाडण्याच्या उपाययोजनेचा भाग म्हणून पोलिसांनी ४३९ जणांना अहिल्यानगर शहरातून हद्दपार केले आहे. मोहरम काळात त्यांना शहरात प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

नगर शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांनी माहिती दिली की भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ (२) कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतील १०३, तोफखाना पोलीस ठाणे हद्दीतील १६२ तर भिंगार कॅम्प पोलीस ठाणे हद्दीतील १७४ अशा एकूण ४३९ जणांना शहरात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे.

# मोहरम मिरवणुकीदरम्यान डीजे लावून ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

नगर - मोहरमच्या पार्श्वभूमीवर झेंडीगेट येथून निघालेल्या 'यादे हुसेन यंग पार्टी' चादर मिरवणुकी दरम्यान कर्कश आवाजात डीजे वर गाणे लावून घोषणाबाजी करुन ध्वनी प्रदुर्षण केले. ही घटना ३ जुलै रोजी टेलिखुंट, कापडबाजार येथे घडली. पोलिसांनी डीजेचे डेसिबल घेतले असता ते १०४.१ इतके आढळून आले. पोलिसांनी दक्षतेने बंदोबस्त सांभाळत मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी योग्य ती कार्यवाही केली. मिरवणुकीनंतर डी. जे. सिस्टीम ताब्यात घेतली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल दीपक मिसाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन यादे हुसेन यंग पार्टीचे अध्यक्ष कलीम साजिद शेख (रा. अ.नगर) व डी.जे. चालक मालक अक्षय विठ्ठलराव शिंगणे रा. बुरुडगाव अ.नगर) यांच्याविरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम व ध्वनीप्रदूषण नियंत्रण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार बडे करीत आहेत. दुसऱ्या कारवाईत तोफखाना पोलिसांनी तौफिक जाफिक शेख (रा.कोठला), मुस्तकीन मोहसीन खान (रा. फलटण चौकी) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधलेल्या १३ गोवंशीय जनावरांची सुटका

नगर - गोरक्षकांच्या सतर्कतेमुळे भिंगार कॅम्प पोलिसांनी कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयतेने बांधलेल्या १ लाख २३ हजार रुपये किंमतीच्या १३ गोवंशीय जनावरांची सुटका केली. ही कारवाई नगर तालुक्यातील शहापूर शिवारातील दर्शन हॉटेलच्या मागील माळरानात ३ जुलै रोजी सायंकाळी ७.३० वाजता केली.

या बाबतची माहिती अशी की, शहापुर शिवारातील दर्शन हॉटेलच्या मागील माळरानात कत्तल करण्याच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तीकडून गोवंशीय जातीची लहान मोठी १३ जनावरांना चारा पाणी न देता अत्यंत क्रूर आणि अमानुष अवस्थेत कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून ठेवलेली गोरक्षकांच्या निदर्शनास आली. त्यांनी याबाबत भिंगार कॅम्प पोलीसांना माहिती दिली. पोलिसांना ही माहिती मिळताच पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन छापा टाकला असता तेथे १३ गोवंशीय जनावरे अज्ञात इसमाने बांधलेले मिळून आले. पोलिसांना तेथे शोध घेतला असता तेथे कोणीही मिळून आले नाही.पोलिसांनी तेथून ९० हजार रुपये किमतीच्या ६ गिर जातीच्या गायी,१५ हजार रुपये किमतीची १ जर्सी जातीची गाय, ३ हजार रुपये किमतीचे खिलारी जातीचे वासरु, १५ हजार रुपये किमतीचे ५ गिर जातीचे लहान वासरु असा १ लाख २३ हजार रुपये किमतीच्या गोवंशीय जनावरे ताब्यात घेऊन त्यांची सुटका केली.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पोलीस नाईक रविंद्र टकले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात इसमाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २७१, तसेच महाराष्ट्र पशुसंवर्धन (सुधारित) अधिनियम १९९५ चे कलम ५ (अ), १ व ९ नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार अकोलकर हे करीत आहेत.

## कोठला झोपडपट्टी येथे गोमांस जप्त

कोठला झोपडपट्टी तील घासगल्ली येथील एका पत्र्याच्या शेड मध्ये गोमांस विक्री करणाऱ्या एकाला तोफखाना पोलिसांनी पकडून त्याच्या कडून ९ हजार २०० रुपये किंमतीचे ४० किलो गोमांस तसेच वजन काटा, सत्तूर असे साहित्य जप्त केले. या प्रकरणी इरफान राजू शेख याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स.पो.नि. पूनम श्रीवास्तव, उपनिरीक्षक परशुराम दळवी, पोलिस अंमलदार अब्दुल इनामदार, सुजय हिवाळे, सुमित गवळी, बाळासाहेब भापसे, सतीश भवर, भागवत बांगर, अविनाश बर्डे, रोहकले यांच्या पथकाने केली.

# गृहिणी

## आरोग्य

### इअरफोन वापरणे टाळावे

मोबाईल ही अशी वस्तू झाली आहे, जिच्याशिवाय आता कोणीच राहू शकत नाही. मोबाईल दिसला नाही की खूप जणांची चिडचिड होऊ लागते. पूर्वी मोबाईल हा फक्त मोठ्या माणसांसाठी कामाची अशी वस्तू होती. पण आता ती अगदी लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सगळ्यांसाठीच जीवनावश्यक वस्तू बनून गेली आहे. इअरफोन किंवा हेडफोन घालणे व गाणे वगैरे ऐकणे तुमच्या कानांसाठी खूप हानिकारक आहे. सतत येणाऱ्या ध्वनी कंपनाचा कानाच्या नसा आणि ड्रमवर परिणाम होतो. यामुळे हळूहळू श्रवणशक्ती कमी होऊ शकते, ज्याला 'आवाज-प्रेरित श्रवणशक्ती कमी होणे' म्हणतात. याशिवाय, जास्त वेळ इअरफोन घालल्याने कानात संसर्ग, खाज सुटणे किंवा जळजळ देखील होऊ शकते.

## पाककला

### दुधी भोपळ्याची रिंग भजी

**साहित्य :** १/२ दुधी भोपळा, १ कप बेसन पीठ, १ टेबलस्पून तांदळाचे पीठ, १ टीस्पून धने पावडर, १/२ टीस्पून जीरे पावडर, १ टेबलस्पून लाल तिखट, १/४ टीस्पून हळद, १/८ टीस्पून हिंग, १/२ टीस्पून ओवा (आवडत असल्यास), चवीप्रमाणे मीठ, थोडे ब्रेड क्रम्स्, थोडी चिरलेली कोथिंबीर, तेल

**कृती :** दुधी भोपळा सालून व धुऊन घेणे. सुरीने त्याचे मध्यम जाडसर आकाराचे, गोल काप करून घेणे. मध्यम आकाराच्या बाटलीचे टोपण घेणे. एक गोल काप घेऊन त्याच्यामध्ये झाकण ठेवणे व दाबून मधला गोल करून घेणे. अशाप्रकारे सर्व गोल रिंग्स तयार करून घेणे. लाल तिखट व मीठ रिंग्स् ला लावून, चोळून बाजूला ठेवणे. एका बाऊलमध्ये बेसन पीठ व तांदळाचे पीठ घेणे. सर्व मसाले घालून घेणे. ओवा हाताने चोळून त्यात घालावा. सर्व व्यवस्थित मिक्स करून घेणे. थोडे थोडे पाणी घालून पीठ भिजवून घेणे. गॅसवर कढईत तेल तापत ठेवणे. भिजवलेल्या पिठात थोडी कोथिंबीर चिरून घालणे. पीठ घट्ट वाटत असल्यास, एक टेबलस्पून पाणी घालून, हलवून घेणे. दोन-तीन रिंग पिठात बुडवून घेणे. पीठ व्यवस्थित निथळून घेणे. पिठात बुडवून व ब्रेडक्रम्स मध्ये घोळवून घेणे. नंतर तेलात सोडावे. कढईत जेवढे मावतील, तेवढे घालावे. दोन्ही बाजूने छान लालसर होईपर्यंत तळून घेणे. गॅस मध्यम आचेवर ठेवावा. अशाप्रकारे सर्व भजी तळून घेणे. टोमॅटो सॉस बरोबर किंवा नुसती खाल्ली तरी छान लागतात.

## वास्तू

✻ जर तुमच्या ओल्या केसांमधून पाणी टपकत असेल तर तुम्ही चुकूनही पूजा करू नये, अन्यथा पाप लागू शकते.

✻ रविवारी नवीन कपडे परिधान केल्याने रोग आणि दोषांची शक्यता वाढते.

✻ शनिवारी नवीन कपडे परिधान केल्याने शनिदेव क्रोधित होतात आणि ते घातक ठरू शकतात.

✻ जर अचानक एखादा कावळा येऊन तुमच्या खांद्यावर बसला, तर हे येणाऱ्या दुर्दैवाचं संकेत असतं.

## सल्ला

कपडे जलद सुकण्यासाठी कपडे जास्त घट्ट पिळून घ्यावे. त्यामुळे जास्तिच पाणी निघून जाईल आणि कपडे लवकर सुकतील.

## सौंदर्य

दररोज सकाळी गाल फुगवून दहा मिनिटे तसेच ठेवावे असे नियमित केल्याने चेहऱ्याची त्वचा ढीली पडली असेल तर ती टाईट होते व सुरकुत्या रहात नाही गाल देखील भरलेले दिसतात

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. ६ जुलै २०२५

**शयनी एकादशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, विशाखा २२|४२, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** शत्रूंना मात द्याल. धनाच्या रुपात यश मिळवाल. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवाल. काम व इच्छित योजनेला अमलात आणाल.

**वृषभ :** आरोग्याची काळजी घ्याल. कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देणे तोट्याचे ठरेल.

**मिथुन :** आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. व्यवसायात प्रगती कराल. स्थिती अनुकूल राहील. आरोग्य उत्तम राहील. दिवसभर आत्मविश्वासी राहाल.

**कर्क :** आर्थिक पक्षाबाबत सुकसान होईल. मातृपक्षाकडून प्रसन्नता राहील. आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील.

**सिंह :** आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. आपल्या इच्छेवर आणि मनस्थितीवर संयम ठेवाल.

**कन्या :** अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील. कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** वाहने चोरीस जातील. कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा पण घाई केल्यास नुकसान होईल.

**वृश्चिक :** पैशाच्या बाबतीत आपली नड भागेल. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. सुख-शांतीचे वातावरण राहील.

**धनु :** बेपर्वाईने कार्य केल्याने नुकसान, कुटुंबियांबरोबर वार्तालाप केल्याने एकमेकांच्या गरजा समजण्यात मदत मिळेल. जुने गैरसमज दूर होतील.


**मकर :** मागील एखादे बाकी राहिलेले काम आज पूर्ण होईल. एखाद्या विशिष्ट योजनेला हातावेगळे करण्यात बराच वेळ जाईल.

**कुंभ :** हितशत्रूंवर मात कराल. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**मीन :** आज आपल्या आयुष्यात आपल्या नातलगांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे. बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२१४ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२१३ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) रक्तात साखरेचे प्रमाण वाढल्यानंतर होणारा एक रोग ४) निर्धन; खंक; अगदी गरीब ६) कथेकरी; कीर्तनकार ८) प्रारंभ; प्रणाम; सुरुवात; वंदन १०) चहा पिण्याचे एक भांडे ११) वेगाने फिरणारी हवा; पवन १२) राक्षसी; डाकीण १४) डोंगराळ जमीन; हार; माला १५) इंग्रजी वर्षाचा पाचवा महिना १६) अरबी देव १८) गुच्छ; झुबका; समूह २०) केस विंचरण्याचे एक साधन २२) फिकीर; पर्वा २३) अधिक चांगला; श्रेष्ठ २४) सांगता; शेवट; समाप्ती

**उभे शब्द :-** १) मोठा; थोर; महा; बडा २) श्रम; परिश्रम; कष्ट ३) प्रत्येक; महादेव; दर; शंकर ४) कृष्णाचा दुष्ट मामा ५) घाबरगुंडी; गडबड; धांदल ७) नवरा; पती; मालक ९) मऊ; नरम; मृदू १०) कौशल्य; हातोटी १३) उत्तराधिकारी; हक्कदार १४) गायनातील एक राग १७) सुगंध; सौरभ १८) एक प्रकारचा साप १९) आकाशातून जाणारे एक वाहन २१) फळातील रसाळ भाग; मगज २२) खडतर व्रत; बारा वर्षांचा काळ

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** शब्द देवून आस निर्माण करण्यापेक्षा साथ देवून विश्वास निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोणती मिरची जास्त तिखट असते हिरवी की लाल?

मिरची हे प्रत्येक स्वयंपाक घरातील एक महत्वाचा घटक आहे. तसेच मिरचीचा तिखटपणा समजून घेणे हा एक गुंतागुंतीचा विषय आहे. तिखटपणाचे मुख्य कारण म्हणजे मिरचीमध्ये आढळणारे कॅप्सेसिन नावाचे रसायन. स्वयंपाकघरात काम करताना, कोणीही कोणतीही वेगळी गणना करू शकत नाही, येथे अंदाज आणि मिरचीच्या प्रकाराच्या आधारेच तिखटपणा शोधता येतो. तसेच हलक्या हिरव्या मिरच्या कमी तिखट असतात तर जास्त असलेल्या असतात. याचे कारण म्हणजे जेव्हा मिरची कची असते तेव्हा तिचा रंग हलका हिरवा असतो. ती पिकू लागते तेव्हा त्यात कॅप्सेसिन नावाचे रसायन वाढू लागते. हे रसायन मिरचीला तिखट बनवते. या पिकण्याच्या प्रक्रियेत मिरचीचा रंग गडद हिरवा होऊ शकतो. म्हणून, गडद हिरव्या मिरच्यांना तिखट मानले जाते, यामागे तसेच लाल मिरची ही हिरव्या मिरच्याच्या अगदी विरुद्ध आहे. हलकी लाल मिरची खूप तिखट असते तर गडद लाल रंगाची मिरची कमी तिखट असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे काश्मिरी लाल मिरची. जी तिच्या गडद लाल रंगासाठी ओळखली जाते परंतु तिचा तिखटपणा खूप कमी असतो. या मिरच्या अन्नाला रंग आणि चव देतात. तसेच, मिरचीचा तिखटपणा त्याच्या रंगापेक्षा त्याच्या विविधतेवर जास्त अवलंबून असतो.

### राक्षसाची भिती

एका शहरात भद्रसेन नावाचा एक राजा राहत होता. त्याची मुलगी रत्नावती खूप सुंदर होती. तिला नेहमीच भीती वाटत असे की कोणीतरी राक्षस तिचे अपहरण करेल. तिच्या राजवाड्याभोवती सर्वत्र पहारा होता.

एका रात्री एक राक्षस पहारेकऱ्यांच्या नजरेतून सुटून रत्नावतीच्या महालात घुसला. तो एका अंधाऱ्या कोपऱ्यात लपला असताना, त्याने रत्नावतीला तिच्या एका मैत्रिणीला बोलताना ऐकले, हा दुष्ट विकल मला नेहमीच त्रास देतो, यावर उपाय शोधा. राजकुमारीकडून हे ऐकून, राक्षसाला वाटले की विकल नावाचा आणखी एक राक्षस असावा, ज्याला राजकन्या इतकी घाबरते. कसा तरी आपल्याला कळावे की तो कसा आहे? तो किती बलवान आहे? असा विचार करून तो घोड्याचे रूप धारण करून तबेल्यात लपला. त्या रात्री, काही काळानंतर, एक चोर राजवाड्यात आला. तो फक्त घोडे चोरण्यासाठी तिथे आला होता.

तो गोठ्यात गेला आणि घोड्यांची काळजी घेतली आणि घोड्याच्या आकाराच्या राक्षसाला सर्वात सुंदर घोडा पाहून तो त्याच्या पाठीवर चढला. घोड्याच्या आकाराच्या राक्षसाला वाटले की हा माणूस नक्कीच विकल राक्षस आहे आणि त्याने मला ओळखले आहे आणि तो मला मारण्यासाठी

(क्रमश:)

## जीवन का अमृत (भाग १)



दया तथा आशीर्वाद देता है। बातें करना आसान है, कर्म करना मुश्किल है। बातों से कुछ प्राप्त नहीं होता, पर कर्म से हम रास्ते पर उन्नति कर सकते हैं।

अतः आध्यात्मिक अभ्यासों में नियमित रूप से, प्रेम और विश्वास के साथ समय देना न भूलें और आप दिन-ब-दिन तरक्की करेंगे। आपको ऊपर

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

कार्यरत गुरु-शक्ति से हर जरूरी आंतरिक सहायता मिलेगी। शिष्य के लिए सदाचारी जीवन के सभी नैतिक गुणों पर सख्ती से चलना जरुरी है। पवित्र और शुद्ध जीवन, रास्ते पर उन्नति के लिए जरुरी है। ये आधारभूत सिद्धांत है और इनमें ढील नहीं दी जा सकती है। जो कोई भी इन्हें तोड़ेगा, उसे इनका फल भुगतना होगा।

जिंदगी की आँधियों का, चाहे वे कितनी भी तेज क्यों न हों, सामना अवश्य करना होगा, पर ऐसा गुरु-शक्ति में पूर्ण आस्था रखकर और भजन-सिमरन में नियमित रह कर करें।

इससे आँधियों की तीव्रता कम हो जाती है तथा उम्मीद और खुशी मिलती है। आँधियाँ तो क्षणिक होती हैं, वे आती जाती रहती हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

काटने को दौड़ते हैं।

निराशा के विचारों से बदबू पैदा होती है । जिस से सभी लोग भागते हैं। निराश व्यक्ति को सभी असहयोग करते हैं। भिखारी उदास होते हैं इसलिये लोग तवजो नहीं देते। शराबी सड़को पर पड़े रहते हैं उन्हे कोई उठाता नही ।

जब क्रोध करते हैं तो उस से जो तरंगे निकलती हैं वह आग जैसी तीखी होती हैं उनसे बहुत गर्मी लगती है यही कारण है क्रोधी से हर कोई बचने की कोशिश करता है।

### आज्ञा चक्र

पांच सूक्ष्म विकारों से अलग अलग प्रकार की दुर्गंध निकलती है, जिस से तन मन बेचैन हो जाता है। वर्तमान समय मानव सूक्ष्म विकारों से पीड़ित है। लोग बोलते अच्छा हैं। ऊंच पदों पर हैं। प्रबंधक अच्छे हैं। नामी ग्रामी हैं । परंतु उनसे जब मिलते हैं तो अच्छी महसूसता नहीं होती। सूक्ष्म विकारों की बदबू महसूस होती है। अपनापन नहीं लगता। इसलिये मानसिक रोग बढ़ रहे हैं। जिन विचारो से बुरा बुरा महसूस हो तो समझो बदबू निकल ही है। लोभ में बुरा बुरा सा लगता है, पश्चाताप सा होने लगता है, ऐसा लगता है जैसे कुछ गलत होने वाला है, परंतु लोभ के वश फंस जाते हैं और लेनदेन कर लेते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'देह भरिला विठ्ठल'

छानसा पाऊस पडतोय. त्याच्या चारचाकीतुन पडणारा पाऊस तो पाहातोय. ड्रायव्हर गाडी चालवतो आहे. त्याने एका प्रशस्त कापड दुकानजवळ गाडी थांबवण्यासाठी ड्रायव्हरला सांगितलं. काही अंतरावर येताच गाडी एका कापड दुकानाजवळ थांबली. ड्रायव्हरने खाली उतरुन, त्याच्या बाजुचा दरवाजा उघडला. एव्हाना पाऊस थांबला होता. तो खाली उतरला, दुकानात आला. मॅनेजरने उठुन नमस्कार केला. काय हवं? हे विचारलं. जे हवं आहे ते त्यानं सांगितलं. क्षणाचाही विलंब न लावता मॅनेजरने स्वतः जाऊन ते कपडे आणुन दिले. ह्याने पैसे दिले. निघाला. गाडीतुन बंगल्यात आला. ड्रायव्हरने गाडी पार्क करुन चावी ठेवली तेव्हा हा म्हणाला 'उद्यापासुन पंधरा दिवस तुला सुट्टी.' ड्रायव्हर आश्चर्याने पाहु लागला.

'आता पंधरा दिवस घरच्यांसाठी वेळ दे.' अत्यानंदाने ड्रायव्हर निघाला. तोपर्यंत नोकराने पाणी आणुन दिलं. हा पाणी पिऊन त्या भव्य दिव्य वास्तुच्या वरच्या मजल्यावरील स्वतःच्या बेडरुममध्ये आला. नवीन पांढरा नेहरु शर्ट आणि धोतर नेसुन पाहिलं. स्वतःचं बदललेलं हे रुप त्याला स्वतःला खूप छान वाटलं. त्या ड्रेसवर त्याने दोन सेल्फी घेतल्या. पत्नी, मुलगा, सुन, नातु सगळ्यांनी एकत्रित जेवण केलं. तो उद्यापासून कुठं जाणार आहे हे सांगितलं. सगळेच आश्चर्याने पाहु लागले. नातू आजोबांच्या पाया पडला. जेवण करुन शतपावली झाली. तो बेडरुममध्ये आला. मनात म्हणाला, 'आता माघार नाही.' सकाळी आवरुन धोतर, नेहरुशर्ट घालुन निघाला. पायी चालु लागला. गावात एक दिंडी आली होती. दिंडीतल्या मुख्य वारकऱ्याला त्याने सांगितलं की मलाही तुमच्यासोबत यायचं आहे.

'जय हरी माऊली' म्हणत सदर वारकरी ह्याच्या पाया पडला. हे उद्योगपतीसुध्दा त्यांच्या पाया पडले. विविध वयोगटातील स्त्री, पुरुष वारकरी विठुमाऊलीच्या दर्शनाच्या ओढीने निघाले. हे सुध्दा विठुमाऊलीच्या जयघोष करत निघाले. प्रत्येक वारकऱ्याला ते पाहु लागले. प्रत्येक वारकऱ्याचा चेहरा हसतमुख. मुखातुन विठुमाऊलीचा जयघोष चाललेला. पाऊस सुरु झाला. पण पावलं चालण्याचं थांबली नाहीत. उद्योगपतीच्या मनात आलं ह्या पावसात भिजलो तर सर्दीच होणार. त्याचं दुसरं मन म्हणालं की सर्दी झाली तरी चालेल पण विठुमाऊलीचं दर्शन पायी जाऊनच घ्यायचं. आता जे काही माझ्या बाबतीत होणार आहे ते माझी विठुमाऊली पाहुन घेईल. हे हजारो वारकरी. ह्यांना व्याप, काळजी असेलंचना ? ह्यांचीही अत्यंत महत्वाची कामं असतीलंचना ? ह्यांनाही संसार आहेचना ? अनेकजण ह्यांच्यातले परिस्थितीने नाजुक असतीलचना ? पण कुणाच्याही चेहऱ्यावर दुःख दिसत नाही.

प्रत्येकजण प्रसन्न चेहऱ्याचा. विठ्ठल विठ्ठलचा जयघोष ऐकु येताच उद्योगपती भानावर आले. एका गावात दिंडी थांबली. तेथील गावकऱ्यांनी ह्या दिंडीतील वारकऱ्यांना शाबुदाणा खिचडी, केळी दिली. प्रत्येक वारकऱ्याने त्या फराळाचा आस्वाद घेतला. गावातील एका मंदिरात दिंडी मुक्कामी होती. एसीची सवय असलेला हा उद्योगपती पण दिवसभराच्या थकल्यामुळे क्षणार्धात झोपला. पहाटे उठुन गार पाण्याने आंघोळ केली. दिंडी मार्गस्थ झाली. पुन्हा दुसऱ्या गावी दिंडी मुक्कामी थांबली. उद्योगपतीने अनेक लहान, मोठ्यांशी संवाद साधला. त्यांना मनापासून खूप छान वाटलं. विठुमाऊलीची लिला अगाध असल्याचं त्यांना जाणवलं. त्यांच्या हे लक्षात आलं की लाखो वारकरी विठुमाऊलीच्या दर्शनाच्या ओढीने येतात. त्यांच्यातली संघभावना, ममत्व, एकनिष्ठता एकमेकांविषयीची काळजी खुप चांगलं असं सांगणारी आहे. माणसामध्ये विठ्ठल पाहणारी ही माणसं पाहुन मी भारावलो आहे. दररोजचं ऊठणं, आवरणं, नाष्टा, कंपनीत येणं, मिटिंग्ज, कंपनीत राऊंड मारणं, स्टाफ, वर्कर, भव्य दिव्य बंगला... हे सगळंच आयुष्यभर आहेच पण हे पंधरा दिवस माझ्या आयुष्याला चांगल्या अर्थाने घडवणारे आहेत.

आपल्याला घडवणारी, वाढवणारी, आपली काळजी घेणारी विठुमाऊलीच आहे. येथुन पुढे दरवर्षी विठुमाऊलीच्या दर्शनासाठी पायी यायचंच. त्यांनी स्वतःच्या पायांचे आभार मानले. एका गावात दिंडी मुक्कामी थांबली. तेथील गावकऱ्यांनी प्रत्येक वारकऱ्याचे पाय चेपुन दिले, तळपायाला तेल लाऊन मालिश केली. उद्योगपतींना खूप छान वाटलं. दिंडीत आलो नसतो तर ह्या आनंदाला मुकलो असतो हा विचारसुध्दा त्यांच्या मनात आला. विठुमाऊलीच्या दर्शनासाठी लाखोवारकरी पाहिले. उद्योगपतीने विठुमाऊलीला मन भरुन पाहिलं. दोन्ही डोळे मिटवुन घेतले. म्हणाले, संपुर्ण जगाला सुखी ठेव. दुःख दे. दुःख झेलण्याची शक्ती दे. ह्या देहात विठ्ठल आहे. त्याची सेवा घडु दे.

(लेख क्र.५५७)

- **सुनील राऊत** माळीगल्ली,
भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

**वडील :** तू एक काम धड करत नाहीस, तुला पुदिना आणायला सांगितला होता तू कोथिंबीर घेऊन आलास, तुझ्यासारख्या मुर्खाला घरातून बाहेर काढले पाहिजे

मुलगा : बाबा! चला एकत्र जाऊया आई म्हणत होती ही मेथी आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ शांतता काळात दिले जाणारे पुरस्कार कोणते?

- अशोक चक्र, किर्ती चक्र, शौर्य चक्र

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

एकूणच या सहा वर्षांमध्येच त्याच्या भावी आ व्यक्तिमत्त्वाचा विकास होणार असतो. त्यातही पहिली तीन वर्षे ही जास्त महत्त्वाची अर आयष्यातील त्याचे हिलरी क्लिंटन यांनी म्हटले आहे, की एखाद्या व्यक्तीचे बालपणाच्या आयुष्यात परस. गंध यांचा आई-वडिलांशी असलेले नाते, त्याच्या पंचेंद्रियांचा

### बौद्धिक विकास कसा करावा?

म्हणजेच शब्द, स्पर्श, रूप, रस, अनुभव यामुळे बालकाचा मेंदू प्रगत होतो. बालपणातीलच अगदी सुरुवातीच्या का मिळणाऱ्या अनुभवामुळेच बालक आनंदी नागरिक होणार की दुःखी होणार, शिस्ताप्रिय बेशिस्त राहणार, जबाबदारी घेणारा पालक होणार की आयुष्यभर निधास्त वृत्तीचा पालक सह हे ठरत असते.


**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आधुनिक बांधकामांचा कल ...







१९९१ नंतर भारत सरकारने अर्थव्यवस्था खुली केली. त्यामुळे उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण हे धोरण भारताने स्वीकारले.

साल १९९१ नंतर अधिकृतपणे आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली झाल्याने सर्वच व्यापारात मोठे बदल घडून आले. बांधकाम क्षेत्रात नवनवीन साहित्य उपलब्ध झाल्याने, विविध व्यावसायिक इमारती व घरांचे तसेच ब्रिजेस, एअरपोर्ट, रेल्वे स्टेशन्स यांचा चेहरामोहरा बदलत गेला. त्यांच्या बाह्यरचनेत व अंतर्गत रचनेत अमुलाग्र बदल झाल्याचे आपणास जाणवत आहेच. त्यातच साल १९९५ नंतर भारतात झालेल्या मोबाईल व इंटरनेट क्रांतीमुळे इतर देशात जो नवीन साहित्याचा वापर सुरू आहे ते तंत्रज्ञान भारतात आले. त्यामुळे आपले पारंपारिक तंत्रज्ञान व बाहेर देशातील तंत्रज्ञान यांचा सरसकट मिलाफ झाल्याने काही इमारती चांगल्या दिसू लागल्या आणि काही इमारतीत अडचणी निर्माण झाल्या.

आपला देश उष्णकटिबंधातला असल्याने पूर्ण ग्लास ग्लेझिंग पश्चिमेला किंवा दक्षिणेला असल्याने सूर्यकिरण डायरेक्ट आत आल्याने आतील वातावरणात बदल झाला त्यामुळे गरज नसताना वातानुकूलन यंत्रणेचा वापर अतिप्रमाणात वाढला. त्यामुळे कोणत्याही साहित्याचा वापर करताना ते आपल्या वातावरणास योग्य आहे का? याचा विचार करणे सुद्धा गरजेचे आहे.

नवीन साहित्यामध्ये नैसर्गिक आणि कृत्रिम असे दोन्ही प्रकारचे साहित्य वापरले जाते.

सध्या २०२५ मध्ये विंटेज आणि आधुनिक डिझाईनचे मिश्रण असलेले साहित्य खूप लोकप्रिय होत आहे.

**नैसर्गिक साहित्य**

i) **लाकूड –**

सागवानाचा वापर दरवाजे व खिडक्या बनवण्यासाठी प्रामुख्याने होतो. लाकडी कलाकुसर असलेले फर्निचर तसेच फ्लोरिंग यांचा वापर करून घराला एक उबदार व नैसर्गिक फिल देता येतो. परंतु आता लाकडी कलाकुसर करणारे कारागीर मिळत नसल्याने व लाकूड महाग झाल्याने त्याचा वापर कमी झाला आहे. मात्र फार्म हाऊसमध्ये लाकडाचा वापर करण्याचे प्रमाण वाढत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याने कमीत कमी लाकूड वापरणे योग्य ठरेल.


II) **दगड व वीट –**

भिंती, फरशी व सजावटी करता दगडाचा व विटांचा वापर केला जातो.

नैसर्गिक दगडांमुळे इमारतींना घराला एक मजबूत व इतरांपेक्षा वेगळा लुक मिळतो.

सध्या बंगल्यातील एखादी भिंत दगडाची किंवा कोरीव विटांचा वापर करून वेगळा लुक देण्याचा कल आहे. फरशी मध्ये कोटा, तंदूर, मार्बल वापरायचे प्रमाण आता कमी होत चालले आहे, त्याऐवजी vitrified टाइल्स वापरण्याकडे कल वाढला आहे.





**कृत्रिम साहित्य :**

I) ग्लेझिंग ग्लास व अॅल्युमिनियम कंपोझिट पॅनल्स.

काच वापरून व त्याचबरोबर अल्युमिनियम कंपोझिट पॅनल्स वापरून कमर्शियल बिल्डींग ना एक कार्पोरेट लुक दिला जातो, यासाठी विविध प्रकारच्या कलरच्या ग्लासेस उपलब्ध आहेत. या ग्लास खास प्रक्रियेने टफन केलेल्या असतात.

ग्लास बसवण्यासाठी अॅल्युमिनियम पाईपचे फ्रेमवर्क केले जाते. ३ M कंपनीचे टेप लावले जातात. एसीपी शीट्स बाहेरील तापमानानुसार प्रसरण व आकुंचन पावतात त्यामुळे फिक्सिंग करताना कमीत कमी ३ ते ५ एम. एम. चा गॅप ठेवणे गरजेचे असते.

या गॅपमध्ये GE कंपनीचे अथवा डाऊ कॉर्निंग कंपनीचे सिलिकॉन सिलंटचा वापर केला जातो.

भूकंप किंवा वादळासारख्या नैसर्गिक आपत्तींचा विचार करून ग्लास व अॅल्युमिनियम कंपोझिट पॅनल फिक्सिंग मजबूत असणे आवश्यक आहे.

**ग्लास ग्लेझिंगचे तीन प्रकार आहेत.**

I) **प्रायमरी ग्लेझिंग–**

II) **स्ट्रक्चरल ग्लेझिंग**

III) **कर्टन ग्लेझिंग**

I) **प्रायमरी ग्लेझिंग हे आर्किटेक्चरल एप्लीकेशन मध्ये वापरले जातात.**

II) **स्ट्रक्चरल ग्लेझिंग**

उंच इमारतींचे ग्लेझिंगसाठी हे वापरले जातात यामध्ये फ्रेम करताना गॅलव्हनाईज्ड कलर कोटेड स्टील आणि झिंक फॉस्फेट किंवा पावडर कोटेड हाय ग्रेड ल्युमिनियमपाईपवापरलेलेअसतात.

III) कर्टन ग्लेझिंग हे सुद्धा स्ट्रक्चरल ग्लेझिंगप्रमाणे फॅब्रिकेशन फ्रेममध्ये केलेले असतात, परंतु यात विंड लोड घेण्यासाठी स्टीफनर रॉड वापरलेले असतात.

**इ) ओपन टू स्काय एरिया रुफिंग**

इमारतीमध्ये पुरेसा उजेड व खेळती हवा असणे अतिशय गरजेचे आहे. जागेची उपलब्धता नसल्याने शहरात अधिक जवळ इमारतींचे बांधकाम करावे लागते पण यात उजेडाचा प्रश्न निर्माण होतो.

उजेडासाठी पुर्वीच्या घरांमध्ये झरोके ठेवत असत. आता ओपन टू स्काय डक्ट ठेवावेच लागतात.

हे ओपन टू स्काय एरिया पावसापासून व तीव्र उन्हापासून कव्हर करणे गरजेचे असते, यासाठी बाजारात वेगवेगळे साहित्य उपलब्ध आहेत.

उजेडासाठी फायबर शीट, पॉली कार्बोनेट शीट, काच, फॅब्रिक हे वापरले जातात. परंतु फायबर शीट काही वर्षांतच तीव्र उन्हामुळे खराब होतात .

पॉलीकार्बोनेट शीट हे अतिशय टफ व स्ट्राँग असलेले शीट्स यासाठी प्रामुख्याने वापरले जातात. GE Lexan ही कंपनी यामध्ये पायोनियर आहे.त्यांचे शीट्स जास्त टिकावु आहेत. खास प्रक्रियेद्वारे आणि अतिनील किरणांपासून बचाव होण्यासाठी बनवलेले हे शीट्स डोम्स, पिरॅमिड्स, कॅनोपी, रेडीमेड डेकोरेटिव्ह सज्जा, half round vault, एका बाजूस अथवा दोन्ही बाजूस उतार असलेले स्ट्रक्चर्स यासाठी हे शीट्स वापरले जातात तसेच पार्टिशन्स, बाथरूम सिलिंग मोठमोठ्या रेल्वे स्टेशन, स्विमिंग पूल कव्हर करण्यासाठी सुद्धा याचा वापर होतो व इंडस्ट्रीजमध्ये उजेडासाठी या शीटचा वापर होतो. परंतु यात काही कंपनीचे शीट्स हे UV Coated नसल्याने व त्यांचा दर्जा चांगला नसल्याने लवकर खराब होत आहेत.

सध्या खेळती हवा ठेवण्यासाठी या शीट्स मध्ये टर्बो व्हेंटिलेटर पण वापरले जातात, त्यामुळे विजेची पण बचत होते.

C) **टेन्साइल स्ट्रक्चर्स.** (Tensile Structures)

सध्या मॉर्डन व अपीलिंग स्ट्रक्चर्स (Visually appealing structures) व आपले वेगळे अस्तित्व दाखवण्यासाठी आय कॅचिंग एलिमेंट (eyecatching element) असलेले व विविध प्रकारचे आकार देता येत असलेले व वजनाला कमी असलेले फॅब्रिक वापरून हे स्ट्रक्चर वापर करण्याचे प्रमाण वाढत आहे.

फॅब्रिकला टेन्शन देऊन व कॉम्प्रेशन न देता त्याचा शेप व स्टॅबिलिटी तयार केलेली असते.

ही स्ट्रक्चर्स सध्या स्पोर्ट्स स्टेडियम, ट्रान्सपोर्ट टर्मिनल ज्यामध्ये एअरपोर्ट रेल्वे स्टेशन्स तसेच हॉटेल, मॉल, पार्किंग, कोर्ट यार्ड यासाठी वापरत आहेत.

या फॅब्रिकमध्ये प्रामुख्याने पीव्हीसी कोटेड पॉलिस्टर व टेफ्लॉन कोटेड ग्लास फायबर हे मटेरियल वापरलेले असते.

सर्ज फेरारी कंपनीचे फॅब्रिक हे सर्वात जास्त टिकाऊ असते, या स्ट्रक्चर्समध्ये लोखंडी पाईप पावडर कोटिंग करून फ्रेमवर्क करण्यासाठी तसेच स्ट्रेंथ व स्टॅबिलिटी देण्यासाठी वापरतात.

स्टील केबल, रॉडस, कनेक्टर, क्लॅम्प यात वापरलेले असतात तसेच अॅल्युमिनियचासुद्धा वापर यात केलेला असतो.

D) **पीव्हीसी रूफिंग शीट्स**

कौलासारखे दिसणारे पीव्हीसी रूफिंग शीट्स बाजारात उपलब्ध आहे त्यामध्ये विविध प्रकारचे प्रोफाइल मिळतात तसेच विविध जी आय कलर कोटेड शीट्स सुद्धा मार्केटमध्ये उपलब्ध आहेत.

E) **रुफिंग शिंगल्स –** (Roofing Shingals) पारंपारिक कौलाच्या काही प्रमाणात असलेल्या मर्यादा लक्षात घेऊन सध्या रुफिंग शिंगल्स हा प्रकार लोकप्रिय होत आहे. रुफिंग शिंगल्स हे विविध डिझाईनमध्ये येतात हे प्रामुख्याने अश्फाल्ट, पॉलिस्टर, बायोलॉजिकल मटेरियलमध्ये बनले जातात.

शिंगल्स प्रामुख्याने स्लोपिंग रूफ, पिरॅमिड, एक अथवा दोन्ही बाजूस उतार असलेल्या इमारतीच्या छतासाठी वापरतात.

सध्या फार्म हाऊसमध्ये फॅब्रिकेशन करून गझीबो तयार करून त्यावर सिमेंट फायबर बोर्ड तसेच मेम्ब्रेन लावतात व हिटिंग गन वापरून शिंगल्स फिटिंग करण्याचे प्रमाण जास्त आहे किंवा विशिष्ट प्रकारचे नेल्स चा वापर करून स्लोपिंग स्लॅबवर शिंगल्स बसवता येतात. मेम्ब्रेन व अश्फाल्ट सिंगल्समुळे पाणी लिकेज होत नाही. साधारणपणे १५ ते २५ वर्षापर्यंत हे शिंगल्स टिकतात.



१९९१ नंतर बांधकाम क्षेत्रात झालेल्या अमुलाग्र बदलांमुळे व जागेची कमी उपलब्धता तसेच वाढते शहरीकरण व वाढीव एस एफ आय मुळे उंच इमारती तसेच घर किंवा व्यावसायिक इमारतीमध्ये नाविन्य आणण्याचा प्रयत्न प्रत्येक जण करीत आहे. यासाठी तज्ञ आर्किटेक्ट, इंजिनियर्स या तज्ञांचा सल्ला घेणे फायदेशीर असते.

प्रत्येक नवीन आलेले साहित्यामध्ये युनिक लुक व फील असतो जो आपणास जास्त किंवा कमी प्रमाणात आवडतो.

आपल्याला योग्य परवडणारे तसेच आपल्या वातावरणाशी जुळणारे, टिकाऊ व इमारतीवर कमीत कमी वजन देणारे साहित्य आपणास निवडावे लागते यासाठी या क्षेत्रातील तज्ञ लोकांचा सल्ला घेणे हे फायदेशीर ठरते.

आम्ही गेल्या २४ वर्षांमध्ये अनेक इमारतींना वेगवेगळे व नवनवीन बांधकाम व इंटेरियर विषयक प्रॉडक्ट्स दिलेले आहेत .

ग्राहकांना टेक्निकल सपोर्टसह उत्तम दर्जासह वेळेत कामे पूर्ण केल्यामुळेच ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.

आम्ही जीइ लेक्सन पॉलीकार्बोनेट शीट्स, फेरारी टेन्साइल (Tensile) फॅब्रिक तसेच सेंट गोबेन शिंगल्स व विवा, युरोबॉन्ड, टायमेक्स, अलस्ट्राँग या कंपनीचे अॅल्युमिनियम कंपोझिट पॅनल व ग्लास ग्लेझिंगची कामे करीत आहोत तसेच ग्राहकांना पुणे, मुंबईबरोबर अ. नगर येथेही नवनवीन मटेरियल देण्याचा प्रयत्न करीत आहोत.

R- Rail ऑलिव्ह कंपनीचे जीना व बाल्कनी रेलींग. बिर्ला एरोकॉन ड्राय वॉल, ग्लास मोझॅक टाइल्स, यूपीव्हीसी रूफिंग शीट्स व गटर्स, कंटेनर, रेडिमेड टॉयलेट्स व सिक्युरिटी केबिन्स तसेच आर्टिफिशियल लॉन्स कार्पेट्स, रोलर ब्लाइंड्स, असे अनेक प्रॉडक्ट्स आम्ही एकाच छताखाली देत आहोत.

अवश्य आमच्या शोरूमला भेट द्यावी, ही सर्व अहिल्यानगरकरांना नम्र विनंती.

**– इंजि. अजित अ. माने**
**मोबा– ९४२२२२ ०१२३, ७३५००१३८०१**
**- BE Civil,**
**Master of Valuation , Arbitrator**
**फर्म– रौनक कन्स्ट्रक्शन्स ॲण्ड हाऊस ऑफ इंटेरीयर्स.**
**- Prudent Valuer's**
**ऑफिस – शॉप नं. २६/२७ अमरदीप कॉम्प्लेक्स, सर्जेपुरा, अ.नगर**
**मेल आय डी – maneajit7@gmail.com**

WE CREATE THE WORLD
Reg. No. Mah/1393/1987
F 1350/1988/ANR
आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# गुलमोहर पार्कमध्ये जलप्रश्न सोडवणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार

## कर्मचाऱ्यांचे सहकार्य नसते तर नागरिकांचे हाल अधिक वाढले असते : माजी नगरसेविका सौ. संगीता खरमाळे यांचे प्रतिपादन

नगर – प्रभाग क्र. ४ गुलमोहर पार्क येथे गेले दोन महिने कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण होते. या समस्येची दखल घेऊन पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्नांती समस्या सोडवली. त्यांच्या या कार्याची दखल घेत गुलमोहर पार्कमधील रहिवाशांच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभ नुकताच पार पडला.



गुलमोहर पार्कमध्ये जलप्रश्न सोडवणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेविका सौ. संगीताताई खरमाळे होत्या. त्या म्हणाल्या, पारिजात चौकात रस्त्याचे काम सुरु झाल्यानंतर ठेकेदाराकडून वारंवार पाईपलाईन फुटण्याचे प्रकार घडत होते. त्यामुळे गुलमोहर पार्कमधील पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. नागरिकांनी पाण्यासाठी प्रचंड हाल सोसले. मात्र पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेवर प्रतिसाद देत सहकार्य केले. त्यांच्या सत्काराने त्यांच्या सेवेला सन्मान मिळतो आहे.

या कार्यक्रमात उपस्थितांनी आपली मनोगते व्यक्त करताना नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. गुलमोहर पार्क येथील रहिवासी संतोष बडवे यांनी म्हटले की, गेल्या दोन महिन्यांपासून पाण्यासाठी नागरिकांचे हाल होत होते. मात्र संबंधित कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी प्रयत्न करत अखेर ही समस्या सोडवली. त्यामुळे त्यांचा सन्मान होणे गरजेचे होते.

कुंडलिक मचे, राख, सोनवणे आजी, उत्तम भोसले आदींनीही आपले विचार मांडून कर्मचार्यांच्या सेवेबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमात पाणीपुरवठा विभागातील प्रदीप ढगे, आपाकभाई, भरत पवार, खाडे मामा आदी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सौ. स्वाती जाधव, प्रज्ञा शिरसागर, कमल दाणे, सौ. देशमुख, सुमेधा बडवे, श्रीमती माने, सौ. भोसले, सौ. रामदासी, सौ. शिर्के, सौ. मचे, सौ. त्रिवेणी घुले, श्रीमती घोलप, जाधव आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक रहिवासी व समितीचे योगदान लाभले.



सर्वसामान्य नागरिकांसाठी प्रथमच पोलिसांच्या कामकाजाच्या परीक्षणाची संधी दिल्याबद्दल प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा सत्कार करण्यात आला.

# सर्वसामान्यांना पोलीसांबद्दल मत नोंदवता येणार

## प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा सन्मान

नगर – पोलीस प्रशासनाचे कामकाज कसे चालले आहे. ते योग्य आहे की नाही? त्यासाठी नागरिकांचा अभिप्राय मिळाल्यास कामकाजात काही सुधारणा करता येईल. या भावनेने घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असून, सर्वसामान्यांना आपले मत नोंदवता येणार असल्याचे ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी स्पष्ट केले.

सर्वसामान्य नागरिकांसाठी प्रथमच पोलिसांच्या कामकाजाच्या परीक्षणाची संधी दिल्याबद्दल प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, रमेश कळमकर, राधाकृष्ण आहेर, विवेक आटपाटकर आदी उपस्थित होते.

तसेच यावेळी दिव्यांग बांधवांवर अन्याय झाल्यास दिव्यांग अधिनियम २०१६ नुसार कारवाई करण्याचे निर्देश सर्व पोलीस स्टेशनला देण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

# आरोग्यसेवकपदावर सतीश गेरंगे यांची नियुक्ती

नगर – भारतीय सैन्य दलातील २१ वर्षांच्या दीर्घ सेवेनंतर सतीश शिवाजी गेरंगे हे ऑगस्ट २०२१ मध्ये सेवानिवृत्त झाले होते. त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली. त्यांनी विविध पदांसाठी परीक्षा दिल्या. सलग ३ वर्षे मेहनत घेतली. अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये सन २०२३–२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत त्यांनी यश संपादन केले. नुकतीच त्यांना निंबळक येथील आरोग्य उपकेंद्रात नियुक्ती देण्यात आली आहे.



आरोग्यसेवक पदावर सतीश गेरंगे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा ग्रामस्थांनी सत्कार केला.

सतीश गेरंगे हे इसळक गावचे. त्यांचा निंबळक गावाशी जवळचा संबंध. आरोग्य विभागाने गेरंगे यांना निंबळक येथील आरोग्य उपकेंद्रात आरोग्यसेवक म्हणून नियुक्ती दिल्याने गावच्या पुत्राला गावची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी आनंद आणि समाधान व्यक्त केले.

सतीश गेरंगे यांचा ग्रामस्थांनी सत्कार केला. यावेळी निंबळक सेवा सोसायटीचे चेअरमन भाऊराव गायकवाड, व्हाइस चेअरमन अविनाश आळंदीकर, संचालक पोपट खामकर, उद्योजक अजय लामखडे, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ खांदवे आदी उपस्थित होते.

गेरंगे यांना गावातच नेमणूक मिळाली असून ते त्यांचे कर्तव्य उत्तमरित्या पार पाडतील, असा विश्वास अजय लामखडे यांनी व्यक्त केला.

सैन्य दलात कार्यरत असताना देशाच्या सीमाभागात कर्तव्य पार पाडले आहे. आता माझ्या जन्मभूमीमध्ये सेवा करण्याची संधी मिळाली असल्याने उत्तम आरोग्य सेवा देण्याचा आणि शासकीय योजनेचा लाभ नागरिकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची प्रतिक्रिया सतीश गेरंगे यांनी दिली.

सतीश गेरंगे यांचा इसळक ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच छाया गेरंगे, उपसरपंच शोभा खामकर, ग्रामपंचायत अधिकारी सुभाष कापसे, अरविंद बेरड, निलेश गेरंगे, गोरख चव्हाण, सदाशिव रोहकले, अनिल खपके, सुनील कोतकर, प्रविण खेसे, प्राथमिक आरोग्य केंद्र टाकळी (खा) येथील सुपरवायझर संतोष सुरसे, आरोग्यसेवक आशिष आरोडे आदींनी शुभेच्छा दिल्या.

# मोहरमनिमित्त हिंदू-मुस्लिम युवकांनी घडविले धार्मिक एकतेचे दर्शन

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथे मोहरमनिमित्त गावातील हिंदू–मुस्लिम युवकांनी एकत्रित येऊन धार्मिक एकतेचे दर्शन घडवले. मौलाना मुनीर सय्यद, हुसेन सय्यद व साजिद सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली सवाऱ्यांची स्थापना केली. स्थापनेच्या परिसरात हिंदू मुस्लिम बांधवांच्या वतीने स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ व सुंदर करण्यात आला. यावेळी हिंदू – मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडत होते. गावातील धार्मिक वातावरण मोहरम झाले होते. मोहरम निमित्त गावात इमाने हसन–हुसेन यांनी धर्मासाठी दिलेल्या बलिदानाची माहिती देणाऱ्या मजलीसचे आयोजन केले होते. मजलीसनंतर भाविकांमध्ये प्रसादचे वाटप करण्यात आले. सरपंच संजय जपकर, रामदास फुले व प्रा. एकनाथ होले यांच्या हस्ते सवाऱ्यावर चादर अर्पण करून गावाच्या सुख शांती व धार्मिक ऐक्यासाठी प्रार्थना करण्यात आली.



मोहरमनिमित्त गावातील हिंदू–मुस्लिम युवकांनी नेप्तीत एकत्रित येऊन घडविले धार्मिक एकतेचे दर्शन घडविले.

भारतामध्ये विविध धर्म –पंत– जात असून मानवता धर्म व भारतीयत्व हे सर्वांना जोडणारे आहे. मोहरम जगामध्ये मुस्लिम बांधव साजरा करतात. यामध्ये देशातील सर्व धर्मीय सहभागी होतात. एकता ही भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य असून मोहरम जगात बंधुभावाचा संदेश देतो असल्याचे प्रतिपादन सरपंच संजय जपकर यांनी केले.

यावेळी माजी उपसरपंच फारूक सय्यद, माजी उपसरपंच संजय जपकर, मार्केट कमिटीचे माजी संचालक वसंतराव पवार, समता परिषदेचे तालुका अध्यक्ष रामदास फुले, प्रा.एकनाथ होले, मौलाना मुनीर सय्यद, ग्रामपंचायत सदस्य दादु चौगुले, बंडू जपकर, प्रा.बाबुलाल सय्यद, हुसेन सय्यद, सादिक पवार, गुलाब सय्यद, नितीन पवार, बबन सय्यद, जावेद सय्यद, अतुल जपकर, जमीर सय्यद, मुनीर सय्यद, मेहबूब सय्यद, सादिक सय्यद, वाजीद सय्यद, मुक्तार सय्यद, नौशाद शेख, सिकंदर शेख, सलीम सय्यद, युनूस सय्यद, हन्सार सय्यद, कयूम सय्यद, उमर सय्यद, नावेद सय्यद, रमिज सय्यद, आदिल सय्यद, परवेज सय्यद, बादशाह सय्यद, रफिक सय्यद, मोईन सय्यद, आसिफ सय्यद, आसिफ शेख, एजाज सय्यद, हमीद सय्यद, नसीर सय्यद आदींसह नाले हैदर यंग पार्टी, दोस्ती तरुण मंडळाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते

# निरामय

## मधुमेह आता तरुणांतही



आरोग्य विशेष


डॉ. कुंदन गायकवाड

मधुमेह हा जगभरात वेगाने वाढणारा आजार आहे. पूर्वी हा आजार वृद्धापकाळातील आजार मानला जात होता. परंतु गेल्या दहा वर्षांत मुले आणि तरुणांनाही या आजाराची लागण होत आहे. सर्वात मोठी समस्या म्हणजे लोकांना या आजाराची लक्षणे माहित नाहीत. हा आजार गंभीर झाल्यावरच कळतो.

अमेरिकन 'सीडीसी'च्या राष्ट्रीय मधुमेह स्थिती अहवालानुसार ३८ दशलक्ष अमेरिकन लोकांना (सुमारे ११.६ टक्के) मधुमेह आहे. यापैकी २० टक्के लोकांना स्वतःला हा विकार असल्याचे माहीत नाही. कारण लोकांना त्याची लक्षणे माहीत नाहीत. मधुमेहाचा शरीरातील इन्सुलिनच्या पातळीवर परिणाम होतो. मधुमेहामागे अनुवंशिकता किंवा चुकीची जीवनशैलीही कारणे असतात. मधुमेह झाल्यावर शरीरात इन्सुलिनचे उत्पादन आणि वापर प्रभावित होतो. त्याचा परिणाम संपूर्ण शरीरावर होतो.

मधुमेह कोणत्याही वयात होऊ शकतो. कुटुंबातील एखाद्याला मधुमेह असेल तर तो होण्याची शक्यता खूप जास्त असते. या आजारापासून बचाव करण्यासाठी त्याच्या लक्षणांबद्दल माहिती असणे खूप महत्वाचे आहे. मधुमेहाच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये थकवा, वारंवार लघवी होणे आणि जास्त तहान लागणे यांचा समावेश आहे. यात रात्री लघवीची समस्या जास्त असते आणि रात्री जास्त तहान लागते. दिवसाही दर अर्ध्या तासाने लघवी करण्याची इच्छा असते. तथापि ते व्यक्तीपरत्वे अवलंबून असते. काही लोक दिवसातून फक्त दोन किंवा तीन वेळा आणि रात्री अनेक वेळा लघवी करतात, तर काही लोक दिवसा जास्त वेळा लघवी करतात. परंतु मधुमेहाच्या रुग्णांमध्ये ही तीन लक्षणे सामान्य आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नये. मधुमेहाची सुरुवातीची लक्षणे जाणवल्यावर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. डॉक्टर तुमच्या शरीरातील साखरेची पातळी तपासण्यासाठी एक चाचणी लिहून देतील. ही चाचणी करून घ्या आणि साखरेची पातळी जास्त असेल तर तुम्ही दिनचर्या आणि आहार यात बदलकरा. तुम्ही साखरयुक्त पदार्थांपासून दूर राहिले पाहिजे. दिवसातून किमान १५ मिनिटे वेगाने चालावे.

## लग्नापूर्वी करा या चाचण्या




जाणून घ्या

डॉ. मेघा दळे

लग्न हा स्त्री आणि पुरुष दोघांच्याही आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो. प्रेम, समज आणि विश्वासासोबत आरोग्याचीही भर पडली तर हे बंधन अधिक मजबूत होते. लग्नाच्या तयारीत बरेचदा लोक कपडे, दागिने, छायाचित्रण आणि सजावटीवर लक्ष केंद्रित करतात. परंतु सर्वात महत्त्वाच्या गोष्टीकडे म्हणजेच आरोग्याकडे लक्ष देत नाहीत. लग्नापूर्वी काही आवश्यक वैद्यकीय चाचण्या केल्याने भविष्यातील जीवन सुरक्षित होतेच, शिवाय अनेक संभाव्य आरोग्य समस्यांना आगाऊ प्रतिबंधदेखील होतो.

*** थॅलेसेमिया आणि अनुवांशिक चाचणी**

थॅलेसेमिया हा एक अनुवांशिक आजार आहे. तो दोन्ही पालकांकडून मुलाला होऊ शकतो. पती-पत्नी दोघेही त्याचे वाहक असतील, तर मुलाला गंभीर समस्या येऊ शकतात. म्हणून, लग्नापूर्वी थॅलेसेमिया मायनर चाचणी आणि इतर अनुवांशिक चाचण्या आवश्यक आहेत.

*** एचआयव्ही चाचणी**

एचआयव्ही, हिपॅटायटीस बी, हिपॅटायटीस सी, सिफिलीस आणि गोनोरियासारखे लैंगिक संक्रमित आजार आहेत का, याची तपासणी करणे महत्त्वाचे आहे. हे केवळ जोडीदाराच्या आरोग्यावरच परिणाम करू शकत नाहीत, तर गर्भधारणेवरही परिणाम करू शकतात.

*** प्रजनन चाचणी**

आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात बरेच लोक प्रजननाशी संबंधित समस्यांना बळी पडत आहेत. लग्नापूर्वी, पुरुष आणि महिला दोघांनीही शुक्राणूंची संख्या आणि ओव्ह्युलेशन सायकल यासारख्या प्रजनन चाचण्या करून घेतल्या पाहिजेत.

*** रक्तगट आणि आरएच फॅक्टर चाचणी**

लग्नापूर्वी रक्तगट आणि आरएच फॅक्टरची माहिती असणे खूप महत्त्वाचे आहे. स्त्री आरएच निगेटिव्ह असेल आणि पुरुष आरएच पॉझिटिव्ह असेल तर गर्भधारणेदरम्यान समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत डॉक्टर विशेष खबरदारी घेण्याचा सल्ला देतात. त्यामुळे भविष्यात समस्या टाळता येतील.


*** मधुमेह आणि थायरॉईड चाचण्या**

थायरॉईड आणि मधुमेहसारखे आजार आजकाल सामान्य झाले आहेत आणि त्यांचा गर्भधारणेवर, मूड स्विंग्ज आणि शारीरिक ऊर्जेवर खोलवर परिणाम होतो. म्हणून वेळेवरच त्यांची तपासणी करणे खूप महत्वाचे आहे.

*** मानसिक आरोग्य मूल्यांकन**

बरेचदा लोक मानसिक आरोग्य गांभीर्याने घेत नाहीत. परंतु लग्नानंतर ते तणाव आणि मतभेदांचे एक मोठे कारण बनू शकते. साधी मानसिक आरोग्य तपासणी केल्याने ती व्यक्ती नैराश्य, चिंता किंवा इतर कोणत्याही मानसिक आजाराने ग्रस्त तर नाही, हे जाणून घेण्यास मदत होऊ शकते. लग्नापूर्वी काही वैद्यकीय चाचण्या करणे केवळ शहाणपणाचेच नाही, तर एक जबाबदारीदेखील आहे. हे तुम्हाला निरोगी जीवनाकडे घेऊन जातेच, शिवाय तुमच्या नात्यात एक नवीन प्रामाणिकपणा आणि विश्वासाचा पायादेखील घालते.


## थंडीत दही खाताना...



कुठे चुकतो आपण?

थंडीमध्ये दही खावं का, असा प्रश्न बऱ्याचजणांना पडलेला असतो. दही खूप गुणकारी आहे. यातल्या कॅल्शियम तसंच इतर घटकांमुळे हाडांना बळकटी मिळते. बऱ्याचजणांना दहीभात खाल्ल्याशिवाय चैन पडत नाही. त्यामुळे थंडीच्या दिवसात दही खाण्याचा मोह आवरता येत नाही. पण थंडीमध्ये दही खाणं टाळायला हवं. कारण थंड वातावरणात दही खाल्ल्यामुळे छातीत कफ साठू लागतो. अस्थमा, सर्दी, खोकला, सायनसची समस्या असणाऱ्यांना दह्यामुळे त्रास होऊ शकतो. थंडीत दही खावंसं वाटलं तरी ते दुपारच्या जेवणात घ्यावं. दही पाच वाजण्याच्या आधी खाणं योग्य ठरतं. कारण थंडगार दही रात्री खाल्ल्यामुळे कफ साठू लागतो. विविध प्रकारची ॲलर्जी असणाऱ्यांनाही याचा त्रास होतो. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे दही लागल्यावर लगेच खायला हवं. फ्रीजमध्ये ठेवलेलं गार दही खाऊ नये. अशा दह्यामुळे त्रास अजूनच वाढू शकतो. त्यामुळे थंडीच्या दिवसात दही खाताना विशेष काळजी घ्यायला हवी.

## कर्करोगावरील आर्क थेरपी



नवे काही


डॉ. सतीश सोनवणे

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार २०२३ मध्ये भारतात कर्करोगाचे १४ लाखांहून अधिक नवीन रुग्ण आढळले. पुरुषांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाचे आणि महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे रुग्ण वाढत आहेत. आजाराचे रुग्ण वाढत असताना नवीन उपचार तंत्रेदेखील येत आहेत. आता अमेरिकन शास्त्रज्ञांनी शरीराच्या नाजूक भागांवर असलेल्या कर्करोगावर उपचार करू शकणारे तंत्रज्ञान विकसित केले आहे. या तंत्राला 'स्पॉट-स्कॅनिंग प्रोटॉन आर्क थेरपी' असे नाव देण्यात आले आहे. या थेरपीला 'प्रोटॉन आर्क थेरपी' असेही म्हणतात.

अमेरिकेत झालेल्या क्लिनिकल चाचण्यांमध्ये या तंत्राचा यशस्वी वापर करण्यात आला आहे. या तंत्रात 'प्रोटॉन बीम'चा वापर करण्यात आला आहे. हे कर्करोगाच्या रुग्णाच्या शरीराभोवती फिरतात आणि ट्यूमर अगदी अचूक पद्धतीने काढून टाकतात. ही उपचारपद्धती अजून नवीन असली तरी आशेचा किरण निर्माण करत आहे. या थेरपीवर केलेले संशोधन 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ पार्टिकल'मध्ये प्रकाशित झाले आहे. या थेरपीचे इतर थेरपींपेक्षा कमी दुष्परिणाम आहेत. रेडिओ आणि केमोथेरपीसारख्या इतर थेरपीमध्ये ट्युमरभोवतीच्या निरोगी ऊतीदेखील मारल्या जातात.

यामध्ये रुग्णाला केस गळणे, थकवा, जळजळ, वेदना आणि उलट्या यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. 'प्रोटॉन आर्क थेरपी'मध्ये फक्त कर्करोगाच्या पेशींवर हल्ला केला जातो आणि त्याचा आसपासच्या उतींवर परिणाम होत नाही.

## महिलांमध्ये वाढताहेत 'हे' आजार




आरोग्य चर्चा

डॉ. दीप्ती नेने

आजच्या धावपळीच्या जीवनात महिला अनेकदा स्वतःकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते. मग हे छोटे आजार हळूहळू मोठ्या आजाराचे रूप धारण करतात. अशा परिस्थितीत महिलांना जागरूक करण्याची गरज आहे.

*** स्तनांचा कर्करोग**

हा महिलांमध्ये सर्वात सामान्य आजार बनला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, गेल्या काही वर्षांत या आजारामुळे सहा लाखांहून अधिक महिलांचा मृत्यू झाला आहे. हा कर्करोग स्तनाच्या उतींमध्ये होतो. स्तनात वाढणाऱ्या पेशी ट्यूमरचे रूप धारण करतात. वेळेवर उपचार केल्यास तो बरादेखील होऊ शकतो.

*** गर्भाशयाचा कर्करोग**

हादेखील महिलांमध्ये एक सामान्य कर्करोग आहे. हा गर्भाशयाच्या मुखाच्या थरात वाढणारा कर्करोग आहे. हा महिलांमध्ये 'एचपीव्ही' मुळे होतो. यामुळे २०२२ मध्ये तीन लाखांहून अधिक मृत्यू झाले आहेत.


*** संधिवात**

महिलांमध्ये वाढत्या वयानुसार संधिवाताचा धोका वाढतो. या आजाराचे १०० हून अधिक प्रकार आहेत. हा आजार सांधेदुखी, सूज, कडकपणा यामुळे होतो.

*** ॲनिमिया**

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, महिलांमध्ये ॲनिमिया सर्वात जास्त आढळतो. शरीराच्या अवयवांमध्ये ऑक्सिजन पोहोचवण्यासाठी पुरेसे हिमोग्लोबिन नसल्यास असे होते. जर त्यावर वेळेवर उपचार केले नाहीत तर ते प्राणघातक ठरू शकते. महिला या आजारांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे हे आजार अधिक धोकादायक बनतात.

## नखावरील रेषा दुर्लक्षू नका



अरोग्य वेध

डॉ. योगेश पोटे

स्वच्छ आणि सुंदर नखे हातांचे सौंदर्य वाढवतात, पण नखे खराब होऊ लागली, तुटू लागली, काळी, पिवळी पडू लागली किंवा नखांवर रेषा दिसू लागल्या तर ही सामान्य गोष्ट नाही. अशी नखे केवळ वाईटच दिसत नाहीत, तर काही आजारांचे संकेतही दर्शवतात. नखांवर हलक्या बारीक रेषा दिसण्याची अनेक कारणे असू शकतात. यामध्ये वृद्धत्व, आरोग्य समस्या किंवा शरीरात काही विशिष्ट पोषक तत्वांचा अभाव असू शकतो.

**वृद्धत्त्वाचे लक्षण**

नखांवर लांब आणि पांढऱ्या बारीक रेषा दिसणे हे वृद्धत्वाचे लक्षण आहे. वाढत्या वयानुसार, शरीरात पोषणाची कमतरता निर्माण होऊ लागते. त्यामुळे अशा आरोग्यविषयक समस्या आणि पौष्टिक कमतरता उद्भवू शकतात. या रेषा अर्ध्या असतील तर ते वृद्धत्वामुळे असू शकते. ते धोकादायक मानले जात नाही. परंतु रेषा खूप खोल असतील आणि नखे तुटत असतील आणि काळे होत असतील तर ही आरोग्याशी संबंधित लक्षणे असू शकतात.

**रेषा काय दर्शवतात?**

***उभ्या किंवा सरळ रेषा**

तुमच्या नखांवर हलक्या रंगाच्या सरळ रेषा येऊ लागल्या, तर वयानुसार या रेषा सामान्य आहेत. त्या धोकादायक मानल्या जात नाहीत; परंतु रेषा खूप खोल असतील आणि त्यासोबतच नखे तुटत असतील किंवा रंगहीन होत असतील, तर ते शरीरातील आरोग्य समस्येचे लक्षण असू शकते. कधीकधी एक्जिमा, खूप कोरडी त्वचा, हायपोथायरॉईडीझम सारख्या समस्यांमुळे नखे जाड किंवा पातळ होतात आणि तुटू लागतात. यामुळे, नखे सहजपणे तुटू शकतात. 'लाइकेन प्लॅनस' हा एक 'ऑटोइम्यून' रोग आहे, ज्यामध्ये नखांवर रेषा दिसू शकतात. त्यांना 'ब्यू लाईन्स' असेही म्हणतात. त्या तणाव किंवा कोणत्याही आजारामुळेदेखील वाढू शकतात.

*** पांढऱ्या रेषा दिसणे**

याला वैद्यकीय भाषेत 'ल्युकोनिचिया स्ट्रायटा' म्हणतात. या रेषा 'मायक्रोट्रॉमा', 'ऑनिकोमाइकोसिस' किंवा आनुवंशिक आजारांमुळे दिसू शकतात. रेषा वाढत असतील तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

*** काळ्या किंवा तपकिरी रेषा:**

काही लोकांच्या नखांवर काळ्या किंवा तपकिरी रेषा येतात. त्यांना 'मेलेनोनीचिया' म्हणतात. नखांवर या रेषा आघात, संसर्ग किंवा औषधांमुळेदेखील येऊ शकतात. काळ्या रेषा शरीरात व्हिटॅमिन सी, झिंक आणि इतर पोषक तत्वांची कमतरता दर्शवतात.

*** पांढऱ्या रेषा किंवा पट्टे :**

यांना मीस लाइन्स म्हणतात. जर तुम्हाला तुमच्या नखांवर अशा रेषा किंवा हलके पट्टे दिसले, तर ते हलक्यात घेऊ नका.

## चयापचय क्रियेचा वेग वाढवण्यासाठी...



काय खावं?

वजन कमी करण्यासाठी चयापयच क्रियेचा वेग वाढवणं गरजेचं असतं. चयापचय क्रियेचा वेग वाढला तरच वजन लवकर कमी होतं. काही पदार्थांच्या पोषक घटकांच्या सेवनामुळे चयापचय क्रियेचा वेग वाढू शकतो. कोणते आहेत हे पदार्थ? जाणून घेऊ.

*वजन कमी करण्यासाठी प्रथिनयुक्त आहार घेण्यावर भर दिला जातो. प्रथिनांमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं राहतं आणि आपण कमी खातो. प्रथिनांमुळे चयापचय क्रियेचा वेग वाढतो. मात्र प्रथिनयुक्त आहार घेण्यासोबतच नियमित व्यायाम करणंही गरजेचं आहे.

* कॉफीमुळेही चयापचय क्रियेचा वेग वाढतो. काही अभ्यासांमधून ही बाब समोर आली आहे. एकापेक्षा अधिक कप कॉफी पिणाऱ्यांचं वजन वेगाने कमी झाल्याचं काही संशोधनांमधून सिद्ध झालं आहे. मात्र कॉफीचं सेवन करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला विसरू नका.

* डाळी आणि कडधान्यांमधून भरपूर प्रथिनं मिळतात. यात फायबरचं प्रमाणही बरंच जास्त असतं. यामुळे पोट बराच काळ भरलेलं राहतं. शिवाय चयापचय क्रियेचा वेगही वाढतो.

* ॲपल सिडर व्हिनेगार खूपच उपयुक्त पदार्थ आहे. याच्या सेवनाने वजनवाढीला मदत मिळते. तसंच या व्हिनेगारचे इतरही लाभ आहेत. पाण्याच्या ग्लासमध्ये दोन चमचे ॲपल सिडर व्हिनेगार घालून पिता येईल. यामुळे चयापचय क्रियेचा वेगही वाढतो.

* वजन कमी करण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं. पाण्यामुळे चयापचय क्रियेचा वेगही वाढतो. त्यामुळे दिवसभरात दोन ते अडीच लीटर पाणी प्यायला हवं.

## सौंदर्य खुलवणारे आयुर्वेदिक उपचार

आयुर्वेद आणि विकार



नववधूने सुंदर आणि आकर्षक दिसणं गरजेचं असतं. चेहऱ्याचं सौंदर्य खुलवण्यासाठी मुली ब्युटी पार्लरमध्ये जातात. महागडी फेशियल तसंच इतर उपचार करून घेतात. काहीजणी कॉस्मेटिक सर्जरीचा पर्यायही निवडतात. मात्र आयुर्वेदिक उपचारांमुळे तुमचं नैसर्गिक सौंदर्य खुलतं. हे उपचार सुरक्षितही असतात. आयुर्वेदिक उपचार पद्धतींमुळे त्वचेवर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. लग्नाआधी मुली काही आयुर्वेदिक उपचार करून घेऊ शकतात. त्याविषयी...


* शिरोधारा या उपचारपद्धतीत कपाळावर हळूवार तेल सोडलं जातं. यामुळे शरीराला नवी ऊर्जा मिळते. या माध्यमातून शरीराची शुद्धी केली जाते. यानंतर आयुर्वेदिक तेलांनी शरीराला मसाज केला जातो. यामुळे शरीरातली सगळी नकारात्मकता दूर होऊन मानसिक शांतता लाभते.

* आयुर्वेदानुसार घामामुळे शरीरातली सगळी विषद्रव्यं निघून जातात. म्हणूनच आयुर्वेदिक स्टीम बाथ खूपच उपयुक्त ठरतो. या उपचारांसाठी तुम्हाला लाकडी खोक्यात झोपवलं जातं. इथे शरीराला औषधी वाफ दिली जाते. या वाफेतले औषधी घटक शरीरात शोषले जातात. शरीराला घाम येतो. या घामावाटे शरीरातले विषारी घटक बाहेर टाकले जातात. यामुळे चेहऱ्याला आणि त्वचेला नैसर्गिक तजेला मिळतो. त्वचा छान चमकदार दिसू लागते. यामुळे शरीराची लवचिकताही वाढते.

* औषधी वनस्पतींपासून तयार केलेला लेप शरीराला लावला जातो. या उपचारपद्धतीला लेपम असं म्हटलं जातं. हळद आणि चंदनयुक्त लेपामुळे त्वचा टवटवीत दिसू लागते.

### नवसंशोधन

## आहारावर बंधनं असल्यास...



विविध आजार तसंच वजन कमी करण्यासाठी अनेकांच्या आहारावर बंधनं येतात. मात्र आहारावरच्या या बंधनांमुळे माणसाला एकटं वाटू शकतं. आहारावर बंधनं आल्यानंतर इतरांसोबत मनसोक्त खाता येत नाही. यामुळे एकटेपणा जाणवतो. इतरांनी ताटात घेतलेले पदार्थ आपल्यालाही ताटात घेता येत नसल्यामुळे आयुष्यात उणीव जाणवते, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. सात संशोधनं आणि पुरेशा प्रयोगाअंती याबाबतचे निष्कर्ष पर्सनॅलिटी अँड सोशल सायकोलॉजी या जर्नलमध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

### काळजी डोळ्यांची

## का सुजतात डोळे?




लेझी आय किंवा अँब्लिओपिया हा लहान मुलांमध्ये आढळणारा नेत्रविकार आहे. यात मुलांच्या एका डोळ्याची दृष्टी दुसऱ्या डोळ्याच्या तुलनेत कमकुवत असते. म्हणजेच तिचा पुरेसा विकास होत नाही. लेझी आयकडे दुर्लक्ष करू नये. ही गंभीर समस्या आहे आणि यामुळे भविष्यात काही गंभीर समस्या जाणवू शकतात. लेझी आयची समस्या असणाऱ्या डोळ्याने पाहिलेल्या गोष्टी मेंदूपर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे मुलांच्या हालचाली मंदावू शकतात. शिवाय भविष्यात कायम स्वरुपी दृष्टीदोष निर्माण होऊ शकतात. त्यामुळे लेझी आयवर तातडीने उपचार करून घ्यायला हवेत.

### काळजी केसांची

## केसांना द्या तुपाचा मसाज

सध्या केसांच्या आरोग्याशी संबंधित ट्रेंड पहायला मिळतो आहे. यात केसांना तुपाने मसाज करण्याचं प्रमाण वाढलं आहे. मसाज केल्यामुळे स्कॅल्प आणि केस दोहोंनाही आराम मिळतो. तुपामुळे केसांच्या मुळांना बळकटी मिळते आणि यामुळे केसांची चांगली वाढ होते. यामुळे केस मजबूत तर होतातच शिवाय केसांची गळतीही कमी होते. शुद्ध तुपामुळे केसांना ओलावा मिळतो. तुपाने मसाज केल्यास केसांचा कोरडेपणा कमी होतो. त्यामुळे तेलाऐवजी तुपाने मसाज करता येईल.



### आजीबाईचा बटवा

## लाभ आवळ्याचे



आवळा हे अत्यंत गुणकारी आणि आरोग्यदायी असं फळ आहे. आवळा हिवाळ्यात मोठ्या प्रमाणात मिळतो. त्यामुळे या दिवसात आवळा खायला हवा. आवळ्यात 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. 'क' जीवनसत्त्वामुळे शरीराला बळ मिळतं. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. थंडीत सर्दी, खोकला, ताप असे आजार त्रास देतात. त्यामुळे 'क' जीवनसत्त्व मिळवण्यासाठी आवळा खूपच उपयोगी पडू शकतो. मधुमेहींनी आवळा खायला हवा. आवळ्यामुळे रक्तातली शर्करा नियंत्रणात राहते. कोलेस्टरॉलची पातळी कमी करण्यात आवळा महत्त्वाची भूमिका बजावतो. आवळ्याच्या सेवनाने वजन कमी व्हायलाही मदत होते.



शाळेच्या प्रांगणात वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी रिंगण करून दिंडीचे प्रस्थान ठेवले.

# नय्यर विद्यालयात रंगला रिंगण सोहळा

नगर – शाळेच्या प्रांगणात वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी रिंगण करून दिंडीचे प्रस्थान ठेवले. दिंडी नामदेव चौक, श्रीराम चौक, एकविरा चौक मार्गे बायजाबाई सोसायटीत आली. यावेळी माजी नगरसेविका संध्याताई पवार व संस्थेच्या संचालिका जनाबाई पवार यांच्या हस्ते पालखीचे स्वागत करण्यात आले व दिंडी बायजाबाई सोसायटी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पोहोचली. यावेळी उपस्थितांच्या हस्ते पांडुरंगाची आरती करण्यात आली व विद्यार्थ्यांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

नय्यर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वारकरी वेशात आकर्षक असे रिंगण केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष काका नय्यर, संस्थेचे उपाध्यक्ष माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, भास्कर गोरे, अशोक बारस्कर, मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक नाथ मोठे, स्वाती जगताप, लक्ष्मण माने सर्व शिक्षकेतर कर्मचारी शिक्षक पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सकस आहार, व्यायाम व तणावमुक्त जीवनशैली निरोगी जीवनाचे रहस्य

## डॉक्टर जयश्री रौराळे यांचे प्रतिपादन

नगर – बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव, तणाव व चुकीची आहार पध्दतीमुळे आजाराचे प्रमाण वाढत आहे. आजारावर मात करण्यासाठी त्याचे लवकर निदान होणे आवश्यक आहे. उत्तम आहार हे उत्तम आरोग्याचे रहस्य आहे. जर आहार योग्य नसेल तर त्याचा फटका तुमच्या शरीराला सहन करावा लागतो. आहारात आवश्यक पोषक तत्वांचा समावेश न केल्यास महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होते. गर्भनिरोधक गोळ्या शरीरातील हार्मोन्सचे संतुलन बिघडवतात, ज्यामुळे अनियमित मासिक पाळीची समस्या देखील उद्भवते. तणावामुळे महिलांना अनेक गंभीर आजारांच्या समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे डॉ. जयश्री रौराळे यांनी स्पष्ट करुन सकस आहार, व्यायाम व तणावमुक्त जीवनशैलीने निरोगी जीवनाचे रहस्य त्यांनी उलगडले.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात महिलांची विविध आरोग्य तपासणी करुन त्यांना



निमगाव वाघा (ता. नगर) येथे महिलांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात मार्गदर्शन करताना डॉ. जयश्री रौराळे.

### निमगाव वाघात महिलांची मोफत आरोग्य तपासणी, आरोग्यावर मार्गदर्शन

आरोग्यावर मार्गदर्शन करण्यात आले. जयश्री नर्सिंग होम (भागीरथी हॉस्पिटल), स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ तसेच धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या या शिबिरास पंचक्रोशीतील महिलांचा प्रतिसाद लाभला. डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी स्त्री रोग तज्ञ डॉ. जयश्री रौराळे, डॉ. विजय जाधव, एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष अतुल फलके, नामदेव फलके, माजी सरपंच रुपाली जाधव, लता कापसे, संदीप साळवे, दिलीप खरात आदींसह महिला उपस्थित होत्या. डॉ. जयश्री रौराळे यांनी महिलांची तपासणी केली.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, निरोगी आरोग्य असल्यास जीवनाचा खरा आनंद घेता येतो. महिलांनी कोणताही आजार अंगावर काढू नये, स्वत:ची काळजी घेतल्यास कुटुंबाची काळजी घेता येणार आहे. वेळेवर आरोग्य तपासणी केल्यास भविष्यातील मोठ्या आजाराचा धोका टाळता येणे शक्य असून, ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनाने या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेल्या शेत जमिन मिळकती ह्या विद्यमान मालक **मनिषा अनिल दुगड ऋषभ दिलीप बोरा दोघे रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. त्याअन्वये विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी बोलणी केली असून आमच्या अशिलाकडून सदर विसारपोटी रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीबाबत कोणतेही **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :**– अ) डि ।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी ग्रामपंचायत हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे वाळुंज ता. नगर येथील शेत जमिनीचा गट नं. ३२४ याचे क्षेत्र १हे. ७७आर. -- पो. ख. ०हे. ०१ आर. असे एकुण क्षेत्र १ हे. ७८ आर. याचा आकार ३ रु.३७ पै. यापैकी विद्यमान मालक मनिषा अनिल दुगड यांच्या मालकीचे दाक्षिण बाजुकडील क्षेत्र ० हे. ७७.५० आर. + पो. ख. ०हे. ०१ आर. असे एकुण क्षेत्र हे. ७८.५ ० आर. हे क्षेत्र.**

**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :-**

पूर्व :- गट नं. ३२५, दक्षिण :- पाण्याचा प्रवाह व गट नं. ३२२,

पश्चिम :- गटनं. ३२३, उत्तर :- गट नं. ३२४ बायपास रस्ता,

ब) डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी ग्रामपंचायत हरीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे वाळुंज ता. नगर येथील शेत जमिनीचा गट नं. ३२५ याचे क्षेत्र ४ हे. ३६ आर. + पो. ख. ० हे. ०३ आर. असे एकुण क्षेत्र ४ हे.३९ आर. याचा आकार ८ रु. ३१ पै. यापैकी विद्यमान मालक ऋषभ दिलीप बोरा यांच्या मालकीचे दक्षिण बाजुकडील क्षेत्र १ हे. ७४ आर. + पो. ख.० हे.० ३ आर. असे एकुण क्षेत्र १ हे. ७७ आर. हे क्षेत्र.**

**यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :-**

पुर्व :- गट न. ३२६, दक्षिण :- पाण्याचा प्रवाह व गट नं. ३२२,

पश्चिम :- गट नं. ३२४, उत्तर :- गट नं. ३२५ बायपास स्ता,

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
ओंकार पंडित मोरे, मो : ९८६०६४६४६२३

अहिल्यानगर
दिनांक : ०५/०७/२०२५

ऑफिस : महालक्ष्मी चेंबर्स, मोरया मंगल कार्यालयासमोर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर




गुणवंत विद्यार्थी, संस्था पदाधिकारी, संस्था निरीक्षक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व पालक

# श्री शाहू विद्या मंदिरचे ज्ञानवर्धिनी परीक्षेत यश

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर संस्थांतर्गत ज्ञानवर्धिनी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेस इ. ६ वी आणि इ.७ वी मधील विद्यार्थी बसतात. सदर परीक्षा ही आठवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्व तयारी चांगली व्हावी या हेतूने संस्थेच्या सर्व शाखांमधून आयोजित केली जाते. या परीक्षेत श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे.(ता.राहुरी) शाळेने घवघवीत यश मिळवले. इ.६ वी चा निकाल १०० टक्के व इ. ७ वी चा ८१.३६ टक्के इतका लागला. इयत्ता सहावीतील चार विद्यार्थी हे जिल्हा गुणवत्ता यादीत आले. आर्वी सुनिल हरिश्चंद्रे हिने ३०० पैकी २८२ गुण मिळवून जिल्ह्यात ६ वा क्रमांक मिळवला व पुढील दोन वर्ष कै.भिवराबाई हरिभाऊ दरे यांच्या स्मरणार्थ ठेवलेल्या शिष्यवृत्तीस व सन्मानचिन्ह मिळवण्यास पात्र झाली. दिया सचिन हरिश्चंद्रे (२८०) जिल्ह्यात सातवी, कृष्णा श्रीकांत भोकरे (२७६) जिल्ह्यात नववा, गौरी प्रदिप हरिश्चंद्रे (२७२) जिल्ह्यात आकरावा क्रमांक पटकावला. यांना रोख स्वरूपात बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष रा. ह. दरे, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त जी.डी.खानदेशे, संस्था निरीक्षक जावळे व राजळे, रेसिडेन्शिअलचे प्राचार्य पोकळे व्ही. के, श्री शाहू विद्या मंदिर चे मुख्याध्यापक रायते एम.डी, पर्यवेक्षक शिंदे ए.आर, शिक्षक जाधव आर.जी. व गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय ज्ञानाची संधी द्या

## शेतकऱ्यांसाठी परदेशी अभ्यास दौरे पुन्हा सुरू करा, आधुनिक शेतीसाठी जागतिक अनुभव आवश्यक



आ. सत्यजित तांबे

नगर – राज्यातील तरुण व प्रगतशील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अनुभव घेता यावा यासाठी कृषी विभागाकडून यापूर्वी परदेशी अभ्यास दौरे आयोजित केले जात होते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून हे दौरे पूर्णतः थांबले असून त्यामुळे शेतकरी वर्गात नाराजी पसरली आहे. हे अभ्यास दौरे पुन्हा सुरू करून शेतकऱ्यांना जागतिक स्तरावरचे ज्ञान मिळावे, यासाठी आमदार सत्यजीत तांबे यांनी विधानपरिषदेत आवाज उठवला आहे.

यापूर्वी कृषी विभागाच्या वतीने राज्यातील निवडक शेतकऱ्यांसाठी परदेशी अभ्यास दौरे आयोजित केले जात होते. लॉटरी पद्धतीने अर्जांची निवड करून शेतकऱ्यांना अमेरिका, इस्त्रायल, नेदरलँड, जपान यांसारख्या देशांमध्ये शेती, प्रक्रिया उद्योग, सिंचन व्यवस्थापन, सेंद्रिय शेती आणि तंत्रज्ञान आधारित शेती पद्धतींचा अभ्यास करण्याची संधी दिली जायची. या दौऱ्यांचा राज्यातील शेती क्षेत्रावर सकारात्मक प्रभाव पडला होता. अनेक शेतकऱ्यांनी परदेशातून शिकलेले तंत्रज्ञान आपल्या शेतात राबवले आणि उत्पादन, प्रक्रिया व विपणन व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा घडवून आणली. मात्र, मागील काही वर्षांपासून हे दौरे पूर्णपणे थांबले आहेत. परिणामी तरुण शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे. आधुनिक शेतीच्या दिशेने त्यांना चालना मिळावी आणि आंतरराष्ट्रीय अनुभवातून नव्या संधींचा लाभ घेता यावा, यासाठी हे दौरे पुन्हा सुरू होणे अत्यंत गरजेचे आहे, असे आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात स्पष्ट केले.

# एकादशीनिमित्त श्री मार्कंडेय मॉर्निंग ग्रुपतर्फे सिद्धीबाग सिद्धेश्वर मंदिरातून दिंडीचे आयोजन

नगर – दरवर्षीप्रमाणे आषाढी एकादशीनिमित्ताने श्री मार्कंडेय मॉर्निंग ग्रुपच्यावतीने सिद्धीबाग सिद्धेश्वर मंदिरातून दिंडीचे आयोजन केले जाते. याही वर्षी दिंडीचे आयोजन केलेले असून सकाळी ७.३० वाजता सिद्धेश्वर मंदिर सिद्धीबागेतून दिंडीला प्रारंभ होईल. भाविकांनी उपस्थित राहून दिंडीची शोभा वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

दिंडी सिद्धेश्वर मंदिर या ठिकाणाहून निघुन श्री मार्कंडेय संकुल दातरंगे मळा या ठिकाणी समारोप होईल. श्री मार्कंडेय मॉर्निंग ग्रुप सिद्धीबागचे अध्यक्ष राजेंद्र कर्नावट यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेला प्लॉट हा विद्यमान मालक यांचे मालकीचा आहे. सदर मिळकतीबाबत विद्यमान मालक यांनी आमचे आशिलासोबत विसारापोटी रक्कम स्विकारलेले आहे. सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी आहे, असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणेत येते की, सदर प्लॉटबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे . काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत वर्णन :-**

**१) मिळकतीचे वर्णन :**– जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी ता. नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे शहरनगर येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे–

**अ) सि.स.नं. ४५१५ब/१ — म्यु.घर नं. ४९३५ — क्षेत्रफळ १९-६ चौ.मी.**

हि संपुर्ण मिळकत व यावर सुमारे ११ वर्षापुर्वीचे जुने आर. सी.सी. स्ट्रक्चरमधील बांधकामाचे क्षेत्र १९-६ चौ.मी. तसेच सि.स.नं. ४५१५ ब/५ मधील सामाईक वाग यासह, अशी संपुर्ण. मिळकत.

**यांसी चतुःसिमा :-**

**पूर्वेस : सि.नं. ४५१५ब/५, सामाईक बोळ**
**दक्षिणेस : सि.स.नं. ४५९५ ब/६ व पुढे बाळ,**
**पश्चिमेस : श्री. लोंढे यांची मिळकत,**
**उत्तरेस : लिहून घेणार यांची मिळकत.**

**ब) सि.स.नं. ४५१५ ब/६ — म्यु.घर नं. ४९३५ — क्षेत्रफळ १७-२ चौमी.**

ही संपुर्ण मिळकत व सि.स.नं. ४५१५ब/५ मधील सामाईक वाग यातील अविभक्त हिश्यासह मिळकत.

**पुर्वेस : सि.स-नं. ४५१५ब/५, सामाईक बोळ,**
**दक्षिणेस : बोळ,**
**पश्चिमेस : सि.स.नं. ४५१२,**
**उत्तरेस : सि.स.नं. ४५१५ ब/**

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक**
श्रीमती. हिराबाई रमेश आरडे, रा. ढोरगल्ली, माळीवाडा, अहिल्यानगर-४१४००१

**ॲड. अविनाश एस. साखला**
एम.कॉम.एलएल.बी.,एलएल.एम., रजि.नं.महा/१३५३/२०२१
२२१७, मोचीगल्ली, अहिल्यानगर, मो : ९८९०१७५१११


# शिशु संगोपन संस्थेच्या विद्यार्थ्यांची दिंडी ठरली लक्षवेधी





शिशु संगोपन संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांची परिसरातून दिंडी काढण्यात आली.

नगर – विठ्ठल..विठ्ठल... विठ्ठला... हरि ओम विठ्ठला..., विठ्ठल नामाची शाळा भरली... माऊली.. माऊली.. अशा विठ्ठलनामाने चिमुकल्यांनी परिसरातून दिंडी काढून परिसर दुमदुमून सोडला. या दिंडीत बालवारकरी हातात भगव्या पतका, टाळ, मृदूंग, विणा घेऊन सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे वृक्षवल्ली आम्हा सोयरी... या गाण्यातून वृक्षारोपण व वृक्षसंवधानाच्या घोषणा देऊन वृक्षलागवडीचे महत्व परिसरातील नागरिकांना पटवून देत होते. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर येथील शिशु संगोपन संस्थेच्या विद्यार्थ्यांची दिंडी काढण्यात आली होती.

शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशाला व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल व महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालय यांच्यावतीने आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांची परिसरातून दिंडी काढण्यात आली. याप्रसंगी मनपा आयुक्त यशवंत डांगे, प्राथमिक चे शिक्षणाधिकारी भास्करावं पाटील, संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा, उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव र.धों.कासवा, सहसचिव राजेश झालानी, खजिनदार विजय मुनोत, राजेंद्र चोपडा, बन्सी नन्नवरे, मनसुखलाल पिपाडा, रश्मी येवलेकर, संजय डागा, वर्मा, सिमा गुंदेचा, कांचन गावडे, विनोद कटारिया, प्राथ.मुख्याध्यापिका योगिता गांधी, माध्यमिक मुख्याध्यपक दत्तात्रय कसबे आदि उपस्थित होते.

याप्रसंगी मनपा आयुक्त यशवंत डांगे म्हणाले आषाढी एकादशी म्हणले की, अवघा महाराष्ट्र विठ्ठलमय होत असतो. पंढरपूरच्या विठूरायाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी दिंडीने जात असतात. ही परंपरा, संस्कृती लहान मुलांमध्ये रुजावी, यासाठी शाळेच्यावतीने काढण्यात आलेल्या दिंडीने मुलांना दिंडीचे महत्व समजण्यास मदत होणार आहे. शाळेच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राबविण्यात येत असलेले उपक्रम कौतुकास्पद आहे, असे सांगून दिंडीचे कौतुक केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा म्हणाले, संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासबरोबर भारतीय संस्कृतीचे ओळख व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. सण-उत्सवाच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये संस्कार रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या पांडूरंग-रुख्मिणी, संतांच्या वेशभुषा, पालखी, टाळ, मृदूंग याबरोबरच पारंपारिक वेशभुषेमुळे सर्वांचे लक्षवेधून घेतले. विद्यार्थ्यांना उपक्रमातून सण-उत्सवांची माहिती दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्राथमिक चे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, संस्था उपाध्यक्ष दशरथ खोसे यांनीही या दिंडीस शुभेच्छा दिल्या. ही दिंडी सविता रमेश फिरोदिया प्रशालेपासून, फुलसौंदर चौक, बारातोटी कारंजा, जुना बाजार, पंचपीर चावडी, जुनी मनपा यानंतर पुन्हा शाळेत आणण्यात आली. या दिंडीचे बारा तोटी कारंजा येथे संस्थेचे खजिनदार विजय मुनोत परिवारच्यावतीने बाल वारकऱ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

तसेच ठिकठिकाणी या दिंडीचे स्वागत करण्यात येत होते. यावेळी शिक्षकवृंद व पालक उपस्थित होते.

# पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी २५ जुलैपर्यंत अर्ज करा

नगर – एकात्मिक आदिवासी प्रकल्प, राजूर यांच्या मार्फत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलींसाठी चार महिन्यांच्या कालावधीचे पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुकांनी २५ जुलै पर्यंत अर्ज पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, मवेशी ता. अकोले येथे सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

१ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी अर्जासोबत १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवासी दाखला किंवा रेशनकार्ड, डोमिसाईल प्रमाणपत्र, चार पासपोर्ट आकाराच्या छायाचित्रांसह अर्ज सादर करावा. उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षांदरम्यान असावे. वजन किमान ४५ किलोग्रॅम व उंची किमान १५५ से.मी. असावी.

प्रशिक्षणासाठी निवड प्रक्रियेत शारीरिक क्षमता चाचणी (८०० मीटर धावणे) व लेखी परीक्षा प्रत्येकी ५० गुणांची, अशा एकूण १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांची निवड मेरिटनुसार करण्यात येईल. उमेदवारांचे ऑफलाइन अर्ज केवळ २५ जुलैपर्यंतच स्वीकारले जातील. त्यानंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

अर्ज भरलेल्या पात्र उमेदवारांनी परीक्षेसाठी २८ जुलै रोजी सकाळी १० वाजता पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, मवेशी ता. अकोले येथे मूळ व छायांकित कागदपत्रांसह उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी ९४२१५२५४१६, ८२७५३४९४१४ अथवा ८८०५६९८९४५.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या प्लॉटसस् मिळकतींचे विद्यमान मालक **१. शेख जावेद अलताफ, २. शेख जुनेद अलताफ,** रा. अलताफ व्हीला, अशोका हॉटेल जवळ, अहमदनगर यांच्या मालकीच्या असून सदर प्लॉटस् मिळकतींचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर प्लॉटस मिळकती निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉटस मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचा वर्णन :**– जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी, अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा परिषद हद्दीतील,**मौजे नागरदेवळे** येथील **सर्व्हे नंबर १ ०३/१ ०४ मधील** खालील वर्णनाचे बिगरशेती खुले प्लॉटस–

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ७० | १६०.०० | १२.०० मीटर रस्ता | प्लॉट नं.६९ | प्लॉट नं.६३ व ६२ | प्लॉट नं.७१ |
| ७१ | १९२.०० | १२.०० मीटर रस्ता | प्लॉट नं.७० | प्लॉट नं.६० व ६१ | ९.०० मीटर रस्ता |

**ॲड.तनवीर एम.शेख** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**ॲड. गुफरान एफ.मोमीन, ॲड.मोहसीन आय.शेख**
कस्तुरी प्लाझा, डाबरे गल्ली, अहमदनगर, मो.नं.९२७०४६४६००/८०८७७४२४२८, ९२०९५९७१५०

दिनांक : ०५/०७/२०२५
अहमदनगर


# मागासवर्गीय मुलांसाठी पहिली शाळा सुरू केलेल्या ऐतिहासिक दिनानिमित्त महात्मा फुले यांना अभिवादन



सुनील सकट यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

नगर – महात्मा फुले यांनी मागासवर्गीय मुलांसाठी पहिली शाळा सुरू केलेल्या ऐतिहासिक दिवसानिमित्त महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त सुनील सकट यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन आगळ्यावेगळ्या पध्दतीने महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आले. नगर-कल्याण रोड येथे झालेल्या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सुनिल सकट, सरिता आष्टेकर, रंजना बर्वे, ऋतुजा नाट, वर्षा उबाळे, निकिता उबाळे, पूजा दातरंगे, गायत्री दातरंगे, आरती सकट, वंदना सकट आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

सुनिल सकट म्हणाले की, ३ जुलै १८५२ मध्ये महात्मा फुले यांनी मागासवर्गीय समाजातील मुलांसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यांनी शैक्षणिक चळवळ चालवून समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण कसे देता येईल यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या योगदानातून मागासवर्गीय आणि वंचित घटकांना शिक्षणाची संधी मिळाली. महात्मा फुले यांनी समाजातील विषमते विरुद्ध लढा दिला आणि शिक्षणाच्या माध्यमातून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. आजही त्यांचे कार्य सर्व समाजासाठी दीपस्तंभ असल्याचे त्यांनी सांगितले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

